महाराष्ट्र शासन

**विधी व न्याय विभाग**

**(सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७)**

# महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८.

(१५ ऑगस्ट २०१३ पर्यंत सुधारित)

# (Maharashtra Act No. XVII of 1998)

# The Maharashtra Animal and Fishery Sciences University Act, 1998.

*(As Modified upto the 15th August 2013)*

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांनी भारतात मुद्रित केले आणि संचालक, शासकीय मुद्रण लेखनसामग्री व प्रकाशन, महाराष्ट्र शासन, मुंबई ४०० ००४ यांनी प्रकाशित केले.

**२०१३**

[ **किंमत** : रु. १३.०० ]

# महाराष्ट्र शासनाची प्र ाशने मिळ याची ठि ा े

- **संचाल**

  शासन मुद्र ा, ले ानसाम ्री व प्र ाशन संचालनालय
  महाराष्ट्र राज्य
  नेताजी सुभाष मा र्,
  **मुंबई ४०० ००४.**
  दूरध्वनी : ०२२–२३६३ २६ ९३, २३६३ ०६ ९५
  २३६३ ११ ४८, २३६३ ४० ४९

- **व्यवस्थाप**

  शास ीय फोटोझिं ो मुद्र ालय व ्रंथा ार
  फोटोझिं ो मुद्र ालय आवार, जी. पी. ओ. जवळ,
  **पु े ४११ ००१.**
  दूरध्वनी : ०२०–२६१२ ५८०८, २६१२ ४७ ५९

- **व्यवस्थाप**

  शास ीय मुद्र ालय व ्रंथा ार
  सिव्हिल लाइन्स,
  **ना ापूर ४४० ००१.**
  दूरध्वनी : ०७१२–२५६२ ६१५

- **सहा. संचाल**

  शास ीय ले ानसाम ्री भांडार व ्रंथा ार
  शहा ंज, ांधी चौ ाजवळ,
  **औरं ाबाद ४३१ ००१.**
  दूरध्वनी : ०२४०–२३३१ ४६८, २३३१ ५२५

- **व्यवस्थाप**

  शास ीय मुद्र ालय व ले ानसाम ्री भांडार
  ताराबाई पा र्,
  **ोल्हापूर ४१६ ००३.**
  दूरध्वनी : ०२३१–२६५० ३९५, २६५० ४०२

**आ ि महाराष्ट्र शासनाच्या प्र ाशनाचे अधि ृत वि ्रेते**

**१९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७.**

महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८.

## अनुक्रमणिका

**उद्देशिका**

कलमे


प्रकरण एक

**प्रारंभिक**

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ

२. व्याख्या

प्रकरण दोन

**विद्यापीठ**

३. विद्यापीठाचे विधिद्वारा संस्थापन

४. विद्यापीठाची उद्दिष्टे, शिक्षणाचे माध्यम व परीक्षा

५. विद्यापीठात प्रवेश व विवक्षित वर्गास सवलती देणे

६. विद्यापीठाचे अधिकार व कामे

७. शासनाच्या पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विकास कार्यक्रमांना मदत करण्यासंबंधात विद्यापीठाची कर्तव्ये

८. कलम ७ खालील निदेशांचे पालन करण्यात कसूर केल्यास, विद्यापीठाकडे निहित असलेल्या जमिनी परत घेण्याचा अधिकार

९. कृषितर किंवा कृषि विद्यापीठांनी पशुविज्ञान व मत्स्यव्यवसाय विज्ञान यातील पदवी इ. देण्यास मनाई

१०. विवक्षित संस्थांचे राज्य शासनाकडे हस्तांतरण

११. तपासणी व चौकशी

प्रकरण तीन

**विद्यापीठाचे अधिकारी**

१२. विद्यापीठाचे अधिकारी व कर्मचारी यांचे वर्गीकरण

१३. कार्यकारी, विद्याविषयक व इतर अधिकारी

१४. कुलपती

१५. प्रति-कुलपती

**अनुक्रमणिका—**चालू

कलमे

१६. कुलगुरू

१७. कुलगुरूचे अधिकार व कर्तव्ये

१८. कुलसचिव

१९. नियंत्रक

२०. विद्याशाखांचे अधिष्ठाते

२१. अधिष्ठात्यांची कर्तव्ये

२२. विद्यापीठाचा संचालक

२३. सहयोगी अधिष्ठाता

२४. विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या शर्ती ठरविण्याचा अधिकार

प्रकरण चार

**विद्यापीठाची प्राधिकरणे**

२५. विद्यापीठाची प्राधिकरणे

२५अ. विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणांचा सदस्य होण्यासाठी पात्रतेच्या शर्ती विनिर्दिष्ट करण्याचा शासनाचा अधिकार

२६. कार्यकारी परिषद

२७. कार्यकारी परिषदेचे अधिकार व कर्तव्ये

२८. कार्यकारी परिषदेच्या सभा

२९. विद्यापरिषद

३०. विद्यापरिषदेचे अधिकार व कर्तव्ये

३१. विद्याशाखा व अभ्यास मंडळ

३२. विद्याशाखांचे अधिकार व कर्तव्ये

प्रकरण पाच

**परिनियम आणि विनियम**

३३. परिनियम

३४. परिनियम कसे करण्यात येतील

३५. विनियम

प्रकरण सहा

**मान्यता**

३६. संशोधन व विशेष अभ्यास संस्थांना व निम्नस्तरीय पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय शिक्षण संस्थांना मान्यता

३७. संस्थांची तपासणी व अहवाल

३८. मान्यता काढून घेणे

**अनुक्रमणिका—**चालू

प्रकरण सात

## अध्यापन, संशोधन व विस्तार शिक्षण

कलमे

३९. अध्यापन कार्यक्रम

४०. विस्तार शिक्षण

४१. संशोधन कार्यक्रम

४२. अध्यापन, संशोधन व विस्तार शिक्षण यांचे समन्वयन आणि कार्य व अभ्यासक्रम आणि सर्वसेवा यांची सांगड

प्रकरण आठ

## वित्त व्यवस्था आणि लेखे

४३. विद्यापीठ निधी

४४. वित्तीय अंदाज

४५. दिलेल्या अनुदानासंबंधीची विवरणपत्रे, विवरणे शासनाला सादर करणे

४६. शासनाचे वित्तीय नियंत्रण

४७. लेखे व लेखापरीक्षा

४८. लेखे ठेवण्यासाठी निदेश

प्रकरण नऊ

## संकीर्ण तरतूद

४९. विवक्षित नेमणुका करारावर करणे

५०. निवड समितीच्या शिफारशींवरून विद्याविषयक कर्मचारीवर्गातील व्यक्तींची नेमणूक करणे

५१. विद्यापीठातील सेवा व पदे यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांसाठी विशेष तरतूद.

५२. पद रिकामे होणे

५३. तात्पुरत्या रिकाम्या जागा भरणे

५४. केवळ सदोष रचना, रिक्त पदे, इत्यादीमुळे कृती व कार्यवाही विधिअग्राह्य नसणे

५५. अर्थविवरणासंबंधातील प्रश्न व विद्यापीठाच्या किंवा संस्थेच्या रचनेसंबंधातील विवाद

५६. विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांमध्ये शिस्त राखणे

५७. हानीसाठी प्राधिकरण व अधिकारी जबाबदार असणे

**अनुक्रमणिका—**समाप्त

कलमे

५८. कृत्यांचे व आदेशांचे संरक्षण

५९. समित्यांची रचना

६०. वार्षिक अहवाल.

६१. पहिल्या अनुसूचित सुधारणा करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

प्रकरण दहा

**महाविद्यालये, संस्था, संशोधन केंद्रे, प्रशिक्षण केंद्रे आणि निधी कर्मचारी वर्ग आणि मालमत्ता इत्यादिंचे हस्तांतरण.**

६२. महाविद्यालये, संस्था, संशोधन केंद्रे, प्रशिक्षण केंद्रे आणि मालमत्ता इत्यादिंचे हस्तातंरण.

६३. घटक महाविद्यालय किंवा विद्याशाखा म्हणून स्थापन करण्यात येणारे नवीन महाविद्यालय किंवा विद्याशाखा.

६४. विवक्षित कर्मचाऱ्यांची सेवा हस्तांतरित करणे.

६५. भविष्यनिर्वाह निधी आणि इतर तत्सम निधींचे हस्तांतरण.

६६. विद्यापीठाला विवक्षित रकमा प्रदान करणे.

प्रकरण अकरा

**संक्रमणकालीन तरतुदी**

६७. पहिल्या कुलगुरूंची नियुक्ती.

६८. पहिल्या कुलगुरूंचे संक्रमणकालीन अधिकार.

६९. पहिल्या कुलसचिवाची नियुक्ती.

७०. पहिल्या कार्यकारी परिषदेची रचना.

७१. पहिल्या व विद्यापरिषदेची रचना.

७२. विद्यांर्थ्यांकरिता विशेष तरतुदी.. .

प्रकरण बारा

**सुधारणा व्यावृत्ती व अडचणी दूर करणे**

७३. सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ ची सुधारणा.

७४. व्यावृत्ती.

७५. अडचणी दूर करणे.

पहिली अनुसूची.

दुसरी अनुसूची.

## सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ [१]

[महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८.]

(राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्र** भाग चार, असाधारण यात दिनांक ४ मे १९९८ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

या अधिनियमात पुढील अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आल्या :—

**सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९.**

**महाराष्ट्र राज्यामध्ये, पशु व मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठाची स्थापना करणे व ते विधिसंस्थापित करणे आणि त्याच्याशी संबंधित आणि तदानुषंगिक बाबींची तरतूद करणे याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** विशेषतः पशु व मत्स्यव्यवसाय विज्ञान यांच्या अभ्यासासाठी सुविधा पुरवण्याकरिता स्वतंत्र विद्यापीठाची स्थापना करणे व ते विधिसंस्थापित करणे आणि या विज्ञानामध्ये संशोधन आणि विज्ञानांचा विस्तार व विकास, तसेच त्यात समन्वय साधणे, त्यांच्याशी संबंधित किंवा पूरक किंवा आनुषंगिक बाबींची तरतूद करणे इष्ट आहे ;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या एकोणपन्नासाव्यावर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

### प्रकरण एक

### प्रारंभिक

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) हे कलम ताबडतोब अंमलात येईल. राज्य शासनास अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही उर्वरित तरतुदी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे त्यातील विनिर्दिष्ट दिनांकास अंमलात येतील असा निर्देश देता येईल.

व्याख्या.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार अन्य अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(१) " पशु " यात पक्षी, मासे, वन्यजीव आणि सरपटणारे प्राणी यांचा समावेश असेल;

(२) " नियत दिवस " म्हणजे कलम (१) च्या पोट-कलम (३) अन्वये निश्चित केलेला दिनांक ;

(३) " घटक महाविद्यालय " म्हणजे पहिल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेले आणि विद्यापीठाच्या प्रत्यक्ष व्यवस्थापनाखाली असलेले महाविद्यालय;

(४) " दुग्धव्यवसाय तंत्रशास्त्र " म्हणजे दुधावर प्रक्रिया करणे, दुधाचे पदार्थ तयार करणे किंवा त्यांची खरेदी-विक्री याचे विज्ञान ;

(५) " विभाग " म्हणजे एखाद्या विषयाच्या किंवा एखाद्या विषयगटाच्या संदर्भात, परिनियमाद्वारे विभाग म्हणून निर्देशित आणि स्थापित केलेला विभाग;

(६) " विस्तार शिक्षण " म्हणजे पशुधन बाळगणारे शेतकरी, घरगुती उद्योग असणारे तसेच पशु आरोग्य किंवा पशु कल्याण किंवा सुधारित पशुसंवर्धन पद्धती यासंबंधीचे इतर गट यांना प्रशिक्षण, पशुधन प्रक्षेत्र व प्रक्षेत्रगृहे यांच्यापर्यंत शासनाच्या पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभागामार्फत नवीन तंत्र व शोध घेण्यासाठी प्रात्यक्षिक दाखवण्यासंबंधातील वैज्ञानिक तंत्रशास्त्राचे विविध टप्पे आणि तत्सम विविध शालेय कार्यक्रम व निरंतर, शैक्षणिक कार्यक्रम ;

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी **महाराष्ट्र शासन राजपत्र,** १९९८, भाग पाच-ए, इं. पृ. १२ पहा.

(७) " मत्स्य विज्ञान " म्हणजे, मत्स्यसंवर्धन, मत्स्यबीज संवर्धन, सागरी जीवशास्त्र, मत्स्य जीवशास्त्र, मत्स्य रोगांचा अभ्यास किंवा पाण्याखालील साधनसंपत्तीच्या विकासाशी संबंधित तंत्र शास्त्राचे व्यवस्थापन;

(८) " कृषि विद्यापीठ " म्हणजे, महाराष्ट्र कृषि विद्यापीठे अधिनियम, १९८३ अन्वये रचना करण्यात आलेली कृषि विद्यापीठे; १९८३ महा. ४१.

(९) " इतर मागासवर्ग " म्हणजे, इतर मागास वर्ग आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती म्हणून राज्य शासनाकडून वेळोवेळी घोषित करण्यात आलेले वर्ग किंवा अशा वर्गाचे भाग किंवा त्यातील गट;

(१०) " विहित " म्हणजे, या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या परिनियमांद्वारे विहित असा आहे;

(११) " मान्यताप्राप्त संस्था " म्हणजे, घटक महाविद्यालय मान्यताप्राप्त संस्था किंवा मान्यताप्राप्त असल्याचे मानण्यात येणारी संस्था वगळून असलेली अशी संशोधन किंवा विशेष अभ्यास यांसाठी असलेली व विद्यापीठाच्या प्रत्यक्ष व्यवस्थापनाखाली असलेली विद्यापीठाने अशी संस्था म्हणून मान्यता दिलेली किंवा मान्यता दिल्याचे मानण्यात आलेली संस्था आणि त्यात, पशुवैद्यक, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विज्ञानांमधील प्रशिक्षण व शिक्षण, सेवांतर्गत पदविका प्रशिक्षण, पशुधन पर्यवेक्षक प्रशिक्षण किंवा असे इतर कोणतेही प्रशिक्षण देणाऱ्या कोणत्याही संस्थेचा समावेश होतो;

(१२) " अनुसूची " म्हणजे, या अधिनियमाच्या अनुसूची ;

(१३) " अनुसूचित जाती " म्हणजे, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३४१ अन्वये महाराष्ट्र राज्याच्या संबंधात, अनुसूचित जाती म्हणून समजण्यात येणाऱ्या जाती, वंश किंवा जनजाती अथवा अशा जाती, वंश किंवा जनजाती यांचे भाग किंवा त्यातील गट आणि या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी त्यात नवबौद्धांचा समावेश होतो;

(१४) " अनुसूचित जमाती " म्हणजे, महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही भागात राहणाऱ्या व भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३४२ अन्वये महाराष्ट्र राज्याच्या संबंधात अनुसूचित जनजाती म्हणून समजण्यात येणाऱ्या जनजाती किंवा जनजाती समाज अथवा जनजातीचे भाग किंवा त्यातील गट;

(१५) " परिनियम " व " विनियम " म्हणजे, अनुक्रमे या अधिनियमान्वये केलेले किंवा केल्याचे मानण्यात येणारे विद्यापीठाचे परिनियम व विनियम;

(१६) " विद्यापीठ " म्हणजे, या अधिनियमान्वये रचना करण्यात आलेले विद्यापीठ;

(१७) " पशु व मत्स्यव्यवसाय विज्ञान " म्हणजे,—

(अ) पाळीव प्राण्यांच्या रोगांचे निदान, उपचार (शस्त्रक्रिया व औषध योजना) व नियंत्रण यांच्या संबंधातील कौशल्य विज्ञान आणि तंत्रशास्त्र, आणि कौशल्य, मूलभूत पशुवैद्यक विज्ञान व उपयोजित पशुवैद्यक विज्ञान ; किंवा

(ब) पशुसंवर्धन, पैदास, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय, सागरी जीवशास्त्र, आणि पशुधन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय यांच्याशी संबंधित मूलभूत व उपयोजित विज्ञान, तसेच त्यांच्याशी संबंधित असलेले जीवतंत्रशास्त्र व तत्सबंधित प्रायोगिक अभ्यास यांसह, व्यवस्थापन तंत्रशास्त्र.

प्रकरण दोन

## विद्यापीठ

**३.** (१) कुलपती, प्रति-कुलपती, पहिला कुलगरु आणि विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेचे व विद्यापरिषदेचे पहिले सदस्य आणि त्यानंतर असे कार्यकारी अधिकारी व सदस्य होतील अशा सर्व व्यक्ती-जेवढ्या मुदतीकरिता त्यात ते पद धारण करतील तेवढा काळ त्यांना याद्वारे, महाराष्ट्र पशु व मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ या नावाचा निगम निकाय म्हणून स्थापित करण्यात येत असून या निगम निकायाची अखंड परंपरा व सामायिक मोहोर असेल आणि त्या नावाने त्याला व त्याच्यावर दावा करता येईल. विद्यापीठाचे विधिद्वारा संस्थापन.

(२) हे विद्यापीठ जंगम व स्थावर अशी दोन्ही प्रकारची मालमत्ता संपादन व धारण करण्यास, विद्यापीठाच्या प्रयोजनांसाठी त्याच्याकडे निहित करण्यात येईल किंवा ते संपादन करील अशी कोणतीही जंगम किंवा स्थावर मालमत्ता भाडेपट्ट्याने देण्यास, तिची विक्री करण्यास किंवा अन्य प्रकारे हस्तांतरित करण्यास आणि करार करण्यास व या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ आवश्यक असतील अशा इतर सर्व गोष्टी करण्यास सक्षम असेल.

(३) विद्यापीठाचे मुख्यालय, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे निश्चित करील अशा ठिकाणी असेल.

(४) पोट-कलम (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही वेळी, राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विद्यापीठाचे मुख्यालय हे पोट-कलम (३) अन्वये नियुक्त केलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी असेल असा निदेश देता येईल.

**४.** (१) विद्यापीठाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे असतील :— विद्यापीठाची उद्दिष्टे, शिक्षणाचे माध्यम व परीक्षा.

(एक) पशुविज्ञान व मत्स्यव्यवसाय विज्ञान यांचे विविध शाखांमध्ये, स्नातकोत्तर शिक्षणासह शिक्षण देणे व त्यात समन्वय ठेवणे;

(दोन) पशुविज्ञान आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान यांमधील अभ्यासाला आणि संशोधनाला आणखी चालना देणे आणि राज्याच्या शेतीविषयक समस्या, शेतकऱ्याच्या आकांक्षा यांच्याशी सुसंगत अशा गरजांवर आधारित संशोधनावर विशेष भर देणे;

(तीन) पशुविज्ञान व मत्स्यव्यवसाय विज्ञान या क्षेत्रांतील निम्नस्तरीय शिक्षण देणे;

(चार) या क्षेत्रातील तांत्रिक कर्मचाऱ्यांची व्यावसायिक प्रगती व्हावी, कौशल्य वाढीस लागावे याकरिता निरंतर शिक्षण, उजळणी प्रशिक्षण पाठ्यक्रम व उन्हाळी वर्ग आयोजित करणे, तसेच तंत्रविषयक परिसंवाद, चर्चासत्र व कार्यशाळा भरवणे;

(पाच) परीक्षा घेणे आणि योग्य वाटतील अशा पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व इतर शैक्षणिक विशेषोपाधी प्रदान करणे;

(सहा) राज्यामध्ये समुचित विस्तार विभागामार्फत ग्रामीण जनता, उद्योग आणि या क्षेत्रातील इतर लाभार्थी यांच्यापर्यंत संशोधनाचे फायदे परिणामकारकपणे पोहोचविण्यासाठी प्रयोग शाळेतील तंत्रज्ञान शेतीपर्यन्त नेण्याचे काम हाती घेणे ;

(सात) उत्पादकता वाढविण्याच्या अंतिम ध्येयाने, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, कुक्कटपालन आणि मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील अध्यापन, संशोधन आणि विस्तार प्रशिक्षण यांची सांगड घालणे ;

(आठ) सागरी व भूजल मत्स्यव्यवसाय वाढवणे, राज्यातील वन्य प्राण्यांचे व प्राणी संग्रहालयातील पशुंचे जतन करणे व तद्विषयक सुधारणा करणे;

(नऊ) खाऱ्या पाण्यातील व गोड्या पाण्यातील मत्स्यसंवर्धनाचा विकास करणे ;

(दहा) खरेदी-विक्रीविषयक पायाभूत सोयींची विकास करणे ;

(अकरा) मच्छिमार आणि पशुधन पाळणाऱ्या शेतकऱ्यांसाठी कल्याणकारी योजना तयार करणे ;

(बारा) पशुधन, मत्स्यव्यवसाय व दुग्धव्यवसाय यांतील उप पदार्थांच्या तंत्रज्ञानाचा विकास करणे ;

(तेरा) आधुनिक तंत्रशास्त्राबाबत अद्ययावत राहण्यासाठी संबंधित राज्य व केंद्र सरकारचे पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय आणि मत्स्यव्यवसाय विकास विभाग आणि पशुवैद्यक विज्ञान, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विज्ञान या क्षेत्रात विशेषज्ञ असणाऱ्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संशोधन संस्था यांच्याशी संपर्क ठेवून जरुर तो दुवा स्थापन करणे.

(२) शिक्षण आणि परीक्षा यांचे माध्यम म्हणून मराठी भाषेच्या वापराला चालना मिळावी यांकरिता विद्यापीठ प्रयत्न करील :

परंतु, वेळोवेळी परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील अशा विषयांकरिता व अशा कालावधीकरिता किंवा कालावधींकरिता, शिक्षण आणि परीक्षा यांचे माध्यम इंग्रजी राहील.

विद्यापीठात प्रवेश व विवक्षित वर्गास सवलती देणे.

**५.** विद्यापीठात ज्या तारखेपासून प्रवेश मागितला असेल त्या तारखेच्या लगतपूर्वीच्या दहा वर्षे मुदतीमध्ये तीन वर्षांहून कमी नसेल इतक्या मुदतीत ज्यांनी किंवा ज्यांच्या आईवडिलांनी महाराष्ट्र राज्यात निवास केला असेल अशा सर्व व्यक्तींना विद्यापीठ खुले असेल आणि धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान किंवा राजकीय किंवा इतर मतप्रणाली याच केवळ कारणांवरून कोणत्याही व्यक्तीस, कोणतीही पदवी, पदविका, प्रमाणपत्र किंवा इतर विद्याविषयक विशेषोपाधी किंवा अभ्यासक्रम यामध्ये प्रवेश देताना वगळण्यात येणार नाही :

परंतु, विद्यापीठास, राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीस अधीन राहून, विद्यापीठाने चालविलेल्या किंवा त्यांचे नियंत्रण असलेल्या कोणत्याही महाविद्यालयात किंवा संस्थेत, विद्यार्थी म्हणून प्रवेश मिळविण्याच्या प्रयोजनाकरिता पुढील वर्गातील व्यक्तींसाठी विवक्षित जागा राखून ठेवता येतील :—

(एक) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती ;

(दोन) इतर मागासवर्ग ;

(तीन) ज्या तारखेस प्रवेश मागितला असेल त्या तारखेच्या लगतपूर्वीच्या दहा वर्षे मुदतीमध्ये किमान तीन वर्षे ज्या व्यक्तींनी व ज्यांच्या आईवडिलांनी या राज्यात निवास केलेला नसेल अशा व्यक्ती ;

(चार) स्वातंत्र्य सैनिकांची मुले ;

सन १९८९ चा महा. ३२.

(पाच) महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९८६* मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे बाधित व्यक्ती आणि त्यांची मुले ;

(सहा) संरक्षण दलातील व्यक्तींची मुले :

---

* महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ (२००१ चा महा. अधि. क्र. ११) पहा.

परंतु आणखी असे की, विद्यापीठास, तशाच मंजुरीस अधीन राहून, लगतपूर्वीच्या परंतुकातील (एक), (दोन), (चार) व (पाच) या सर्व किंवा कोणत्याही प्रवर्गाखाली येणाऱ्या व्यक्तींना, विद्यापीठास योग्य वाटेल अशी फी किंवा जेवणाचा, राहण्याचा किंवा इतर खर्च किंवा सर्व फी व आकार यांची माफी देता येईल किंवा विद्यापीठास योग्य वाटेल अशा विशेष शिष्यवृत्तीची त्यांच्यासाठी तरतूद करता येईल :

परंतु त्याचप्रमाणे, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, प्रवेशासाठी विहित विद्याविषयक अर्हता किंवा अन्य अर्हता किंवा विद्याविषयक दर्जा नसणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस अशा अभ्यासक्रमास प्रवेश देणे किंवा पदवी बहाल करण्यासाठी आवश्यक किमान अर्हतेपेक्षा कमी शैक्षणिक प्रगती असणाऱ्या व्यक्तींना किंवा विद्यापीठाच्या प्रयोजनांना किंवा इतर विद्यार्थ्यांच्या व विद्याविषयक कर्मचारीवर्गाच्या हक्कांना व विशेष हक्कांना बाधक ठरेल अशी वर्तणूक असणाऱ्या व्यक्तींना विद्यापीठाच्या हजेरीपटावर ठेवणे विद्यापीठास भाग पडणार नाही :

परंतु तसेच, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, विहित केलेल्या संख्येहून अधिक विद्यार्थ्यांना किंवा विहित केलेल्या अर्हतेपेक्षा कमी असेल अशी विद्याविषयक किंवा इतर अर्हता असलेल्या विद्यार्थ्यांना, कोणत्याही अभ्यासक्रमास प्रवेश देणे विद्यापीठास भाग पडणार नाही.

**६.** या अधिनियमाच्या तरतुदींस अधीन राहून, विद्यापीठास पुढील अधिकार असतील व ते पुढील कामे पार पाडील :— विद्यापीठाचे अधिकार व कामे.

(एक) पशु विज्ञान व मत्स्यव्यवसाय विज्ञान आणि विद्यापीठास योग्य वाटेल अशा विद्येच्या इतर शाखा यातील शिक्षणाची तरतूद करणे;

(दोन) संशोधन करण्यासाठी आणि संशोधनाचे निष्कर्ष व तांत्रिक माहिती यांचा विस्तार शिक्षण कार्यक्रमाद्वारे प्रसार करण्यासाठी तरतूद करणे;

(तीन) पुढील प्रकारच्या व्यक्तींसाठी अभ्यासक्रम सुरू करणे, परीक्षा घेणे आणि त्यांना पदव्या, पदविका, प्रमाणपत्र व विद्याविषयक इतर विशेषोपाधी प्रदान करणे—

(अ) ज्यांनी विहित अभ्यासक्रम पूर्ण केला असेल, किंवा

(ब) ज्यांनी विहित असे संशोधन, विद्यापीठात किंवा याबाबतीत विद्यापीठाने मान्यता दिलेल्या एखाद्या संस्थेस पार पाडले असेल अशा व्यक्ती;

(चार) पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व विद्याविषयक इतर विशेषोपाधी चालू करणे;

(पाच) विहित अशा सन्मान्य पदव्या व इतर विशेषोपाधी प्रदान करणे;

(सहा) विद्यापीठाचे नियमित विद्यार्थी म्हणून ज्यांची नावे पटावर दाखल करण्यात आली नसतील असे क्षेत्र कार्यरत, शेतकरी व इतर व्यक्ती यांच्यासाठी व्याख्याने व शिक्षण यांची तरतूद करणे आणि विहित अशी प्रमाणपत्रे त्यांना देणे;

(सात) अध्यापन, संशोधन व विस्तार शिक्षण यांसाठी प्रयोगशाळा, ग्रंथालये, संशोधन केंद्र संस्था, प्रात्याक्षिक केंद्रे, वस्तुसंग्रहालये व मत्स्यालये स्थापन करणे व त्यांची व्यवस्था ठेवणे आणि विद्यापीठाचे विद्यार्थी व कर्मचारी यांच्यासाठी योग्य वाटतील अशा इतर सोयींची तरतूद करणे;

(आठ) पशु व मत्स्यव्यवसाय विज्ञाने व संलग्न विज्ञाने यांसंबंधीची महाविद्यालये, केंद्रे, कार्यशाळा, शाखा व इतर संस्था व त्यांची वसतिगृहे सुरू करणे व त्यांची व्यवस्था ठेवणे;

(नऊ) विद्यापीठांच्या विद्यार्थ्यांचा निवास, वर्तणूक व शिस्त यांवर देखरेख व नियंत्रण ठेवणे आणि त्यांचे आरोग्य व कल्याण यांचे संवर्धन करण्यासाठी व्यवस्था करणे;

(दहा) विद्यापीठास आवश्यक अशी अध्यापन, संशोधन व विस्तार शिक्षण यासंबंधातील पदे सुरू करणे व अशा पदांवर व्यक्तींच्या नियुक्त्या करणे;

(अकरा) प्रशासकीय, लिपिकवर्गीय व इतर पदे निर्माण करणे व अशा पदांवर व्यक्तींच्या नियुक्त्या करणे;

(बारा) परिनियमांनुसार अधिछात्रवृत्त्या, शिष्यवृत्त्या व पारितोषिके चालू करणे व ती देणे;

(तेरा) विहित अशी फी व इतर आकार निश्चित करणे, त्यांची मागणी करणे व ती स्वीकारणे;

(चौदा) विद्यापीठ ठरवील अशा रीतीने व अशा प्रयोजनासाठी इतर विद्यापीठांशी व शासकीय विभागांशी सहकार्य करणे;

(पंधरा) विद्यापीठांच्या व त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या महाविद्यालयांच्या व संस्थांच्या विद्यार्थ्यांच्या व कर्मचारीवर्गाच्या गरजा भागविण्यासाठी ग्राहक सहकारी संस्थांची तरतूद करणे;

(सोळा) मासे आणि पशुधन यांच्यासाठी रोगनिदान केंद्रे स्थापन करणे;

(सतरा) विद्यापीठाच्या उद्देशांच्या पुष्ट्यर्थ आवश्यक अशा सर्व कृती व गोष्टी — मग त्या अधिकार व कामे, यांच्याशी अनुषंगिक असोत वा नसोत—करणे.

शासनाच्या पशुसंवर्धन, दुग्ध-व्यवसाय व मत्स्यव्यवसाय विकास कार्यक्रमांना मदत करण्या-संबंधात विद्यापीठाची कर्तव्ये.

**७.** राज्याचे पशुधन पैदास धोरण व मत्स्यव्यवसाय पैदास धोरण यांमध्ये तरतूद करण्यात आली असेल त्याप्रमाणे, आपल्या संशोधन प्रक्षेत्रांमध्ये पशुंच्या जाती व मूळ पशुधन यांची पैदास करणे, अशा जातींचे उत्पादन व त्यांपासून मिळणाऱ्या उत्पादकतेच्या अंदाजित खर्चाचे सर्वेक्षण पार पाडणे आणि वैरण विकास योजना, गोड्या पाण्यातील कोळंबी बीज व मत्स्यबीजांचे इतर प्रकार त्यांचा खर्च, उत्पादकता तसेच शासनाच्या पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय कार्यक्रमास मदत व पाठिंबा म्हणून, प्रति-कुलपती कुलपतींना कळवून वेळोवेळी निदेश देईल अशा, इतर योजना किंवा कामे, निदेशांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीत पार पाडणे किंवा ती हाती घेणे हे विद्यापीठाचे कर्तव्य असेल.

कलम ७ खालील निदेशांचे पालन करण्यात कसूर केल्यास, विद्यापीठाकडे निहित असलेल्या जमिनी परत घेण्याचा अधिकार.

**८.** कलम ७ अन्वये काढलेल्या निदेशांनुसार, विद्यापीठ हे त्याच्याकडे निहित असलेल्या जमिनांचा आणि प्रक्षेत्रांचा योग्य वापर करण्यात कसूर करीत आहे असे राज्य शासनाचे मत होईल तर, राज्य शासनास, विद्यापीठाला, नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात आल्याप्रमाणे त्याच्याकडे निहित असलेल्या जमिनी किंवा प्रक्षेत्रे राज्य शासनाने परत का घेऊ नयेत याची कारणे, विनिर्दिष्ट मुदतीत दाखविण्यास, नोटिशीद्वारे फर्माविता येईल. विद्यापीठाने दाखविलेल्या कारणांचा, — असल्यास, विचार केल्यानंतर, राज्य शासनास नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या सर्व किंवा कोणत्याही जमिनी, किंवा प्रक्षेत्रे आदेशाद्वारे, विद्यापीठाकडून आपल्याकडे परत घेता येतील आणि एकतर स्वतः किंवा याबाबतीत त्याने विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही एजन्सीमार्फत तिच्या विकासाचे कार्यक्रम किंवा त्यावरील कामे हाती घेता येतील.

**९.** राज्यामध्ये कोणतेही कृषीतर किंवा कृषी विद्यापीठ स्थापन करण्याशी संबंधित कोणत्याही अधिनियमांमध्ये काहीही अंतर्भुत असले तरी, असे कोणतेही विद्यापीठ, पशु विज्ञान व मत्स्यव्यवसाय विज्ञान यातील कोणतीही पदवी, पदविका, प्रमाणपत्र किंवा विद्याविषयक इतर विशेषोपाधी देण्यास सक्षम असणार नाही.

कृषितर किंवा कृषि विद्यापीठांनी पशुविज्ञान व मत्स्यव्यवसाय विज्ञान यातील पदवी इ., देण्यास मनाई.

**१०.** जर विद्यापीठाच्या मते, त्याच्याकडे हस्तांतरित अथवा निहित करण्यात आलेले कोणतेही महाविद्यालय, संशोधन संस्था, शाळा, केंद्र, कार्य अथवा इतर संस्था, ही त्याच्या गरजेपेक्षा अधिक असेल तर, विद्यापीठाला ती राज्य शासनाने स्वतःकडे घ्यावी अशी राज्य शासनाला विनंती करता येईल. अशी विनंती करण्यात आल्यावर, राज्य शासनाला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे निदेश देता येईल की, अशी संस्था, अधिसूचनेत विनिर्दिष्ट अशा तारखेपासून आणि (तीत अथवा तिच्या अधीन सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांशी संबंधित असतील अशा अटी व शर्ती धरून) अशा अटींवर व शर्तींवर, विद्यापीठाकडे निहित असण्याचे बंद होईल आणि ती राज्य शासनाकडे जाईल आणि राज्य शासनाकडून चालविण्यात येईल; आणि त्यानंतर अशा संस्थेच्या संबंधातील विद्यापीठाची सर्व मालमत्ता व मत्ता आणि दायित्वे, राज्य शासनाकडे हस्तांतरित आणि निहित होतील. तथापि, संस्थेबरोबरच राज्य शासनाकडे हस्तातरित केलेल्या कर्मचाऱ्यांच्या कोणत्याही सेवाशर्ती, असल्यास, त्या अशा हस्तांतरणाच्या लगतपूर्वी त्यांना लागू असतील अशा सेवा शर्तीपेक्षा कमी अनुकूल असणार नाहीत.

विवक्षित संस्थांचे राज्य शासनाकडे हस्तांतरण.

**११.** (१) कुलपतीस, तो निदेश देईल अशा एक वा अनेक व्यक्तींकडून किंवा व्यक्तीनिकायाकडून कोणतेही विद्यापीठ, तिच्या इमारती, कृषिक्षेत्रे, प्रयोगशाळा, ग्रंथालये, वस्तुसंग्रहालये, कार्यशाळा यांची व विद्यापीठाने चालविलेले, त्यांच्या व्यवस्थेखाली असलेले किंवा त्याने मान्यता दिलेले कोणतेही महाविद्यालय, संस्था किंवा वसतीगृह यांची साधनसामग्री व विद्यापीठाकडून किंवा त्याच्या वतीने किंवा त्याच्या विद्यमाने चालविण्यात येणारी अध्यापनाची किंवा इतर कामे यांची आणि परीक्षा संचालन किंवा विद्यापीठाची इतर कामे यांच्या तपासणीची व्यवस्था करण्याचा अधिकार असेल आणि विद्यापीठाचे प्रशासन किंवा वित्तव्यवस्थेशी संबंधित असलेल्या कोणत्याही बाबीसंबंधी तशाच रीतीने चौकशी करण्याचा अधिकार असेल.

तपासणी व चौकशी.

(२) कुलपती प्रत्येक प्रकरणी, अशी तपासणी किंवा चौकशी करवून घेण्याच्या आपल्या हेतुबद्दलची यथोचित नोटीस विद्यापीठास देईल आणि विद्यापीठास प्रतिनिधी नियुक्त करण्याचा हक्क असेल. उक्त प्रतिनिधीस अशा तपासणीच्या किंवा चौकशीच्या वेळी, उपस्थित राहण्याचा व आपली बाजू मांडण्याचा हक्क असेल.

(३) अशी तपासणी किंवा चौकशी करवून घेण्यात आल्यानंतर, कुलपती, अशा तपासणीचे किंवा चौकशीचे निष्कर्ष कुलगुरूस लेखी कळवू शकेल आणि कुलगुरु, कार्यकारी परिषदेस, कुलपतीचे मत कळवील आमि कुलपतींनी विनिर्दिष्ट केली असेल अशा कालमर्यादेत, कार्यकारी परिषदेचे मत त्याच्यामार्फत कुलपतीस कळविण्यासाठी तिला फर्माविल. कार्यकारी परिषदेने, विनिर्दिष्ट कालमर्यादेत, आपले मत कळविल्यास ते मत विचारात घेतल्यानंतर किंवा कार्यकारी परिषदेने निर्दिष्ट कालमर्यादेत आपले मत कळविण्यास कसूर केल्यास, ती कालमर्यादा संपल्यानंतर, कुलपतीला पुढील कार्यवाही म्हणून कार्यकारी परिषदेने करावयाच्या कारवाईबाबत तिला कळविता येईल अशी कारवाई करण्यासाठी कालमर्यादा निश्चित करता येईल.

(४) कार्यकारी परिषद, अशा रीतीने निश्चित केलेल्या मुदतीच्या आत, कुलपतीने दिलेल्या सल्ल्यानुसार जी कारवाई करण्यात आली असेल किंवा करावयाचे योजिले असेल त्याबद्दल, कुलगुरूमार्फत, कुलपतीस कळवील.

(५) निश्चित केलेल्या मुदतीच्या आत, कुलपतीचे समाधान होईल अशा रीतीने, कार्यकारी परिषदेकडून कारवाई करण्यात आली नसेल त्या बाबतीत, आणि कार्यकारी परिषदेने सादर केलेले स्पष्टीकरण किंवा दिलेले अभिवेदन विचारात घेतल्यानंतर त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे, कुलपती निदेश देऊ शकेल आणि कार्यकारी परिषद व इतर संबंधित प्राधिकारी अशा निदेशांचे पालन करतील.

(६) निकटपूर्वीच्या पोट-कलमांमध्ये काहीही अंतर्भूत असेल तरी, कोणत्याही बाबीच्या संबंधात विद्यापीठाचे कामकाज हे विद्यापीठाच्या उद्देशांच्या पुष्ट्यर्थ किंवा हा अधिनियम आणि परिनियम आणि विनियम यांच्या तरतुदींनुसार चालविण्यात येत नाही किंवा विद्यापीठाचे अध्यापन, परीक्षा, संशोधन, विस्तार शिक्षण, प्रशासन अथवा वित्तव्यवस्था यांचा दर्जा कायम ठेवण्यासाठी विशेष उपाय योजणे इष्ट आहे असे कुलपतीचे कोणत्याही वेळी मत होईल तर त्यास, ज्या बाबीसंबंधातील स्पष्टीकरण आवश्यक असेल ती बाब, कुलगुरूमार्फत, कार्यकारी परिषदेस सूचित करता येईल आणि तो विनिर्दिष्ट करील अशा मुदतीच्या आत असे स्पष्टीकरण देण्याबद्दल कार्यकारी परिषदेस फर्मावता येईल. विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या मुदतीच्या आत कोणतेही स्पष्टीकरण देण्यात कार्यकारी परिषद कसूर करील किंवा कुलपतीच्या मते समाधानकारक नसेल असे स्पष्टीकरण कार्यकारी परिषद देईल तर, कुलपतीस, त्यास आवश्यक वाटतील असे निदेश देता येतील आणि कार्यकारी परिषद व इतर संबंधित प्राधिकारी अशा निदेशांचे पालन करतील.

(७) कार्यकारी परिषद, कुलपती वेळोवेळी फर्मावील त्याप्रमाणे, विद्यापीठाचे प्रशासन व वित्तव्यवस्था यासंबंधीची माहिती पुरवील.

(८) कार्यकारी परिषद, राज्य शासन वेळोवेळी फर्मावील त्याप्रमाणे, विद्यापीठाची मालमत्ता किंवा त्याचे कामकाज यासंबंधातील विवरण किंवा इतर माहिती राज्य शासनास देईल.

प्रकरण तीन

## विद्यापीठाचे अधिकारी

विद्यापीठांचे अधिकारी व कर्मचारी यांचे वर्गीकरण.

**१२.** विद्यापीठातील कर्मचाऱ्यांचे खालील प्रवर्गापैकी एका प्रवर्गात वर्गीकरण करण्यात येईल :—

(अ) कार्यकारी, विद्याविषयक व इतर अधिकारी.—ज्यांना प्रशासकीय प्राधिकार असेल व ज्यांना ह्या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये अशा प्रकारे पदनिर्देशित करण्यात आलेले असेल ;

(ब) विद्याविषयक कर्मचारी वर्ग.—ज्यांना अध्यापन, संशोधन व विस्तार शिक्षण यांसारखे विद्याविषयक स्वरूपाचे काम असेल व जे या, अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये पदनिर्देशित करण्यात येतील असे प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, संशोधन अधिकारी, सहायक प्राध्यापक, संशोधन सहायक, अधिव्याख्याता किंवा प्रयोग निर्देशक किंवा तत्सम व्यावसायिक पद धारण करणारे असतील ;

(क) लिपिकवर्गीय कर्मचारी.—जे विद्यापीठाच्या सेवेत असतील व ज्यांचा वरील (अ) व (ब) प्रवर्गामध्ये समावेश करण्यात आलेला नसेल.

**१३.** विद्यापीठाचे कार्यकारी, विद्याविषयक व विद्यापीठाच्या परिनियमांद्वारे घोषित करण्यात आलेले इतर अधिकारी खालीलप्रमाणे असतील :— कार्यकारी, विद्याविषयक व इतर अधिकारी.

**(अ) कार्यकारी**

(एक) कुलपती,

(दोन) प्रति-कुलपती,

(तीन) कुलगुरू,

**(ब) विद्याविषयक अधिकारी**

(एक) विद्यापीठाचा संचालक.

(दोन) विद्याशाखांचे अधिष्ठाते.

(तीन) सहयोगी अधिष्ठाते.

**(क) इतर अधिकारी**

(एक) कुलसचिव.

(दोन) नियंत्रक.

(तीन) ग्रंथपाल.

**(ड) परिनियमांद्वारे घोषित करण्यात आलेले अधिकारी**

परिनियमाअन्वये विद्यापीठाचे " विद्याविषयक अधिकारी " किंवा " इतर अधिकारी " म्हणून घोषित करण्यात येतील अशा इतर व्यक्ती :

परंतु, एकाच व्यक्तीला " विद्याविषयक अधिकारी " किंवा " इतर अधिकारी " किंवा " परिनियमांद्वारे घोषित अधिकारी " या प्रवर्गामध्ये एकापेक्षा अधिक पदांवर नेमता येईल ;

परंतु आणखी असे की, " विद्याविषयक अधिकारी " किंवा " इतर अधिकारी " किंवा " परिनियमांद्वारे घोषित अधिकारी " या प्रवर्गामध्ये कोणत्याही वेळी कोणतेही पद भरता येईल किंवा रिकामे ठेवता येईल.

**१४.** (१) महाराष्ट्राचे राज्यपाल या विद्यापीठाचे कुलपती असतील. कुलपती.

(२) कुलपती हा, त्याच्या पदपरत्वे, विद्यापीठाचा प्रमुख असेल आणि उपस्थित असेल तेव्हा तो विद्यापीठाच्या पदवीदान समारंभाच्या वेळी अध्यक्ष म्हणून काम करील.

(३) कुलपतीस, आपल्या माहितीसाठी म्हणून, विद्यापीठाच्या कामकाजासंबंधीचे कोणतेही कागदपत्र मागविता येतील आणि विद्यापीठ अशा मागणीचे पालन करील.

(४) कोणतीही सन्मान्य पदवी प्रदान करण्याचा प्रत्येक प्रस्ताव कुलपतीकडून कायम केला जाण्यास अधीन असेल.

(५) कुलपतीस, विद्यापीठाच्या कोणत्याही अधिकाऱ्याचे किंवा प्राधिकरणाचे, हा अधिनियम, परिनियम किंवा विनियम यांस अनुसरून नसेल अथवा विद्यापीठाच्या हितसंबंधास बाधक असेल असे कोणतेही कामकाज, लेखी आदेशान्वये, विलोपित करता येईल :

परंतु, कुलपती असा कोणताही आदेश देण्यापूर्वी, असा आदेश का काढण्यात येऊ नये यासंबंधीची कारणे दर्शविण्यासाठी अधिकाऱ्यास किंवा प्राधिकरणास फर्मावील आणि तो याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशा वेळेच्या आत कोणतेही कारण दर्शविण्यात आले असेल तर, तो त्याचा विचार करील.

(६) कुलपती, ह्या अधिनियमान्वये ठरवून देण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करील आणि अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

प्रति-कुलपती. **१५.** (१) महाराष्ट्र राज्याचा पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय मंत्री, विद्यापीठाचा प्रति-कुलपती असेल आणि तो कुलपतीच्या अनुपस्थितीत विद्यापीठाच्या पदवीदान समारंभाच्या वेळी अध्यक्ष म्हणून काम करील.

(२) प्रति-कुलपतीला स्वतःच्या माहितीकरिता विद्यापीठाच्या कामकाजासंबंधी असलेले कोणतेही कागदपत्र मागविता येतील व विद्यापीठ अशा मागणीचे पालन करील.

(३) विद्यापीठाच्या कामकाजाचा वार्षिक कार्यक्रम, प्रति-कुलपतीकडे त्याच्या माहितीसाठी पाठविण्यात येईल व त्याने केलेल्या कोणत्याही सूचनेचा, कार्यकारी परिषदेकडून विचार करण्यात येईल.

(४) तसेच प्रति-कुलपती कुलपती लेखी आदेशाद्वारे त्याच्याकडे सोपवील अशा-कुलपतीच्या इतर अधिकारांचा वापर करील व अशी इतर कर्तव्ये बजावील, आणि अशा रितीने अधिकार व कर्तव्ये सोपविणे हे, अशा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा निर्बंधांस व शर्तीस अधीन असेल.

कुलगुरू. **१६.** [१][(१) कुलपती हा, कुलगुरूची नेमणूक पुढील पद्धतीने करील :—

(अ) कुलगुरूची नेमणूक करण्यासाठी कुलपतींना योग्य अशा नावांची शिफारस करण्याकरिता पुढील सदस्यांचा समावेश असलेली एक समिती असेल :—

(एक) कुलपतीने नामनिर्देशित केलेला सदस्य, जो सर्वोच्च न्यायालयाचा निवृत्त न्यायाधीश असेल किंवा उच्च न्यायालयाचा निवृत्त मुख्य न्यायमूर्ती असेल किंवा पशुसंवर्धन किंवा दुग्धव्यवसाय तंत्रशास्त्र किंवा मत्स्यव्यवसाय या क्षेत्रातील राष्ट्रीय ख्यातीचा विख्यात संशोधक असेल किंवा कृषी क्षेत्रात किंवा तत्संबंधित क्षेत्रात त्याला पद्म पुरस्कार मिळाला असेल ;

(दोन) राज्य शासनाने, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने, विद्यापीठाची कार्यकारी परिषद व विद्याविषयक परिषद यांनी संयुक्तपणे नामनिर्देशित केलेला सदस्य, जो भारतीय पशुवैद्यक संशोधन संस्था, इज्जतनगर, राष्ट्रीय दुग्धव्यवसाय संशोधन संस्था, करनाल किंवा केंद्रीय मत्स्यव्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई यांसारख्या पशुवैद्यकशास्त्र किंवा दुग्धव्यवसाय तंत्रशास्त्र किंवा मत्स्यविज्ञान या क्षेत्रातील ख्यातनाम राष्ट्रीय संस्थेचा किंवा संघटनेचा संचालक किंवा प्रमुख असेल ;

(तीन) महाराष्ट्र शासनाच्या कृषी , पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागातील सचिव (पदुम) किंवा शासनाने नामनिर्देशित केलेला शासनाच्या सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला कोणताही अधिकारी ;

(ब) कुलपतीने नामनिर्देशित केलेला सदस्य हा समितीचा अध्यक्ष असेल ;

(क) नामनिर्देशित केलेला सदस्य हा विद्यापीठाशी किंवा कोणत्याही महाविद्यालयाशी किंवा विद्यापीठाच्या कोणत्याही मान्यताप्राप्त संस्थेशी संबंधित नसलेली व्यक्ती असेल ;

(ड) समितीचे सर्व तीन्ही सदस्य उपस्थित असल्याखेरीज समितीची कोणतीही बैठक घेतली जाणार नाही.]

१. सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ याच्या कलम २(क) अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[1][(२) नामिका तयार करण्याची प्रक्रिया ही कुलगुरूचे पद रिक्त होण्याच्या संभाव्य दिनांकाच्या किमान तीन महिने पूर्वी सुरू करण्यात येईल आणि ती कुलपतीने निश्चित केलेल्या कालमर्यादेच्या आत पूर्ण करण्यात येईल. तथापि, कुलपतीला निकडीच्या परिस्थितीत तसे करणे आवश्यक असेल तर अशी कालमर्यादा वाढविता येईल ; तथापि, अशा रीतीने वाढविण्यात आलेला कालावधी एकूण तीन महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही.

(२अ) समिती, कुलपतीच्या विचारार्थ, कमीत कमी पाच योग्य व्यक्तींच्या नामिकेची कुलगुरू म्हणून नेमणूक केली जाण्यासाठी शिफारस करील. अशा प्रकारे शिफारस करण्यात आलेली नावे, कोणताही पसंतीक्रम न दर्शविता वर्णक्रमानुसार नमूद केलेली असतील. नामिकेत समाविष्ट असलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या योग्यतेची सविस्तर माहिती अहवालासोबत असेल.

(२ब) कुलपतीस, अशा नामिकेतील उक्त व्यक्तींमधून एकाची कुलगुरूच्या पदासाठी निवड करता येईल व तिची अशा पदावर नेमणूक करता येईल. नामिकेतील व्यक्तींपैकी कोणतीही व्यक्ती कुलपतीस मान्य नसेल किंवा कुलपतीने कुलगुरूच्या पदासाठी निवड केलेल्या व्यक्तीची कुलगुरूचे पद स्वीकारण्याची इच्छा नसेल तर, कुलपतीस त्याच समितीमधून किंवा या प्रयोजनार्थ नवीन समिती घटित झाल्यावर अशा नवीन समितीमधून नवीन नामिका करण्यास फर्माविता येईल.

(२क) कुलगुरू म्हणून नेमणुकीसाठी समितीद्वारे शिफारस केलेली व्यक्ती,—

(अ) प्रख्यात विद्वान असेल व उच्च दर्जाचा प्रशासक असेल ;

(ब) स्वतःच्या उदाहरणाने नेतृत्व करण्यास समर्थ असेल ;

(क) दूरदृष्टी देण्यास समर्थ असेल आणि ती दृष्टी विद्यार्थ्यांच्या व समाजाच्या हितासाठी प्रत्यक्षात आणण्यासाठी सक्षम असेल ; आणि

(ड) राज्य शासनाने, कुलपतीशी विचारविनिमय करून, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट केलेली अशी शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करणारी असेल.

(२ड) सर्वात योग्य उमेदवारांची शिफारस व्हावी याची सुनिश्चिती करण्याकरिता, पात्रतेच्या शर्ती व कुलगुरू म्हणून नियुक्तीसाठी नावांच्या शिफारशींची प्रक्रिया यांना मोठ्या प्रमाणत प्रसिद्धी देण्यात येईल.]

(३) कुलगूरु हा विद्यापीठाचा पूर्णकालिक वेतनी अधिकारी असेल.

[2][(४) कुलपतीस, कुलगुरूच्या पदाकरिता वर नमूद केलेल्या समितीद्वारे, शिफारस केलेल्या व्यक्तींमधून, एका व्यक्तीची नियुक्ती करता येईल. अशा प्रकारे नियुक्त केलेला कुलगुरू पाच वर्षांच्या मुदतीकरिता पद धारण करील आणि तो पुनर्नियुक्तीस पात्र असणार नाही.]

(५) कुलगुरुला तीन महिन्यांची नोटीस दिल्यानंतर कुलपतीकडे लेखी राजीनामा सादर करून आपल्या पदाचा राजीनामा देता येईल. कुलपतीकडून राजीनामा स्वीकारण्यात आल्यानंतर तो परिणामसक्षम होईल.

---

१. सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ च्या कलम २(ख) अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी ही पोट-कलमे दाखल करण्यात आली.

२. वरील अधिनियमाच्या कलम २(ग) अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

(६) (अ) कुलपतीस-कुलगुरुने कलम ७ अन्वये प्रति-कुलपतीकडून देण्यात आलेल्या निदेशांची अंमलबजावणी करण्याची आपली जबाबदारी पार पाडण्यात हयगय केली आहे किंवा वाजवी सबबीशिवाय कसूर केली आहे या कारणावरून-प्रति कुलपतीने केलेल्या शिफारशींवरून, कोणत्याही वेळी, आदेशाद्वारे कुलगुरुस पदावरून काढून टाकता येईल.

(ब) कुलपतीच्या मते, कुलगुरु, या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करीत नसेल किंवा तसे करण्यास नकार देईल तर किंवा त्याच्याकडे निहित असलेल्या अधिकारांचा दुरूपयोग करील तर, आपण कुलपतीच्या मते कुलगुरु पदावर असण्याचे चालू राहणे हे विद्यापीठाच्या हितसंबंधास बाधक ठरत असेल तर, कुलपतीस, कार्यकारी परिषदेशी विचारविनिमय करून, कोणत्याही वेळी, आदेशाद्वारे, कुलगुरुस पदावरून काढून टाकता येईल.

(क) खंड (अ) किंवा (ब) याखालील कोणताही आदेश, कुलगुरुस त्याच्याविरूद्ध करावयाच्या कार्यवाहीच्या संबंधात आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी देण्यात आल्याशिवाय, काढण्यात येणार नाही.

(७) (अ) कुलगुरु, राज्य शासन, वेळोवेळी, भविष्यलक्षी किंवा पूर्वलक्षी प्रभावाने निश्चित करील एवढी वित्तलब्धी घेईल ;

(ब) कुलगुरुच्या सेवेच्या इतर शर्ती परिनियमांद्वारे ठरविण्यात येतील व कुलगुरु म्हणून त्यांच्या नेमणुकीच्या वेळी त्याने मान्य केल्या असतील त्यानुसार असतील :

परंतु, वित्तलब्धी व सेवेच्या इतर शर्ती यांमध्ये, कुलगुरु म्हणून त्याच्या असलेल्या पदावधीत त्याचे नुकसान होईल अशा रीतीने बदल करण्यात येणार नाही.

(८) मृत्यू, राजीनामा या कारणामुळे किंवा अन्यथा कुलगुरुचे पद रिकामे झाल्यास, कुलपतीस या कलमाच्या पोट-कलम (१) अनुसार कुलगुरुची रीतसर नेमणूक करण्यात येईपर्यंत, कुलगुरु म्हणून काम पाहण्यासाठी संचालकास किंवा विद्यापीठाच्या अधिष्ठात्यास किंवा कोणत्याही अन्य व्यक्तीस नामनिर्दिष्ट करता येईल :

परंतु, अशा अंतरिम व्यवस्थेची मुदत [१][बारा महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही.]

(९) रजा, आजारपण, किंवा इतर कारणांमुळे कुलगुरुचे पद तात्पुरते रिकामे होईल त्याबाबतीत प्रतिकुलपती, कुलगुरुच्या पदाची कर्तव्ये पार पाडण्याकरिता त्याला योग्य वाटेल अशी व्यवस्था करील. अशी व्यवस्था होईपर्यंत त्या प्रयोजनार्थ प्रतिकुलपतीने नामनिर्दिष्ट केलेला संचालक किंवा अधिष्ठाता किंवा अन्य कोणतीही व्यक्ती कुलगुरुच्या पदाची नित्याची कर्तव्ये पार पाडील :

परंतु, दोन महिन्यांपेक्षा कमी मुदतीसाठी पद रिकामे झाल्याच्या बाबतीत, कुलगुरु, लेखी आदेशाद्वारे, आपली कर्तव्ये, तातडीची उपाययोजना म्हणून संचालकाकडे किंवा अधिष्ठात्याकडे किंवा त्यांच्या अनुपस्थितीत, कुलसचिवाकडे सोपवील.

कुलगुरूचे अधिकार व कर्तव्ये.

**१७.** (१) कुलगुरु हा विद्यापीठाचा प्रमुख कार्यकारी अधिकारी असेल आणि विद्यापीठाचा संचालक व विद्याशाखाचे अधिष्ठाता यांच्या सहकार्याने विविध उपक्रमांमध्ये समन्वय साधणे, त्यांचे संनियंत्रण करणे व त्यांना मार्गदर्शन करणे ही कामे करील. कुलपतीच्या किंवा प्रतिकुलपतीच्या अनुपस्थितीत, तो विद्यापीठाच्या कोणत्याही पदवीदान समारंभाच्या वेळी अध्यक्ष म्हणून काम करील तसेच, तो कार्यकारी परिषदेचा आणि विद्यापरिषदेचा पदसिद्ध सदस्य व अध्यक्ष असेल.

(२) कुलगुरुचे विद्यापीठांच्या कामकाजावर सर्वसाधारण नियंत्रण असेल व विद्यापीठामध्ये शिस्तीचे यथोचीत पालन होण्यासाठी तो जबाबदार असेल.

---

१. सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ याच्या कलम २(घ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(३) कुलगुरूस, कार्यकारी परिषदेची व विद्यापरिषदेची सभा बोलविण्याचा अधिकार असेल.

(४) हा अधिनियम आणि परिनियम व विनियम यांच्या तरतुदींचे निष्ठापूर्वक पालन केले जाईल याबद्दल खात्री करून घेणे कुलगुरुचे कर्तव्य असेल ; आणि त्यास या प्रयोजनाकरिता आवश्यक ते सर्व अधिकार असतील.

(५) विद्यापीठाचे योग्य प्रशासन तसेच, वित्तीय प्रशासन आणि अध्यापन, संशोधन व विस्तार शिक्षण कार्यक्रम यांचा व्यवस्थित समन्वय व एकात्मिकरण यासाठी कुलगुरु जबाबदार असेल.

(६) कलम ७ अन्वये प्रति-कुलपतीने वेळोवेळी दिलेल्या निदेशांची, विद्यापीठ आणि त्यांचे प्राधिकारी व अधिकारी यांच्याकडून त्वरित व रीतसर अंमलबजावणी करवून घेण्यास कुलगुरु जबाबदार असेल आणि या अधिनियमामध्ये किंवा या अधिनियमाखाली केलेले परिनियम व विनियम यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, त्यास, या प्रयोजनासाठी आवश्यक असलेले सर्व अधिकार असतील आणि त्यांचा तो वापर करील.

(७) कुलगुरू, समुचित अधिकारी व कर्मचारी यांच्यामार्फत, मुख्यालयाच्या ठिकाणी व मुख्यालयाबाहेर, विद्यापीठाकडून चालविण्यात येणारी महाविद्यालये, विभाग, विशेष अभ्यास संस्था, प्रयोगशाळा, ग्रंथालय, संग्रहालये, वसतिगृहे व शाळा यांची व्यवस्था ठेवील.

(८) कुलगुरूस, विद्यापीठाचे कामकाज योग्य रीतीने चालविण्याकरिता त्यास आवश्यक वाटतील अशा, विद्यापीठविषयक सर्व कामकाजाचे अहवाल महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्था व वसतिगृहे यांच्याकडून मागविता येतील.

(९) कुलगुरू, विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचा निवास, वर्तणूक व शिस्त यांवर देखरेख व नियंत्रण ठेवील. तसेच तो, विहित करण्यात येईल अशा समितीशी विचारविनिमय करून, विद्यार्थ्यांचे आरोग्य व सर्वसाधारण कल्याण यांच्या संवर्धनाची व्यवस्था करील.

(१०) कुलगुरूस, या अधिनियमात किंवा परिनियमांत तरतूद केल्याप्रमाणे विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्याचा अधिकार असेल.

(११) कुलगरू, वार्षिक लेखे व ताळेबंद, कार्यकारी परिषदेकडे वेळेवर सादर करण्यास जबाबदार असेल.

(१२) कुलगुरू, विद्यापीठाची मालमत्ता व निधी धारण करील, त्यावर नियंत्रण ठेवील व त्यांची व्यवस्था असेल.

(१३) कुलगुरू, विशिष्ट प्रयोजनासाठी विद्यापीठाच्या स्वाधीन करण्यात आलेल्या निधीची व्यवस्था पाहील.

(१४) कुलगुरू, विद्यापीठाचे कामकाज चालविण्यासाठी त्यास उपलब्ध असलेल्या साधनसामग्री मधून व कलम ४४ अन्वये केलेल्या वित्तीय अंदाजानुसार तरतूद करील.

(१५) कुलगुरू हा अधिनियम व परिनियम याद्वारे व तदन्वये त्याला नेमून दिलेल्या अधिकारांचा वापर करताना आणि कर्तव्ये बजाविताना, त्या कारणासाठी कार्यकारी परिषदेने नियुक्त करावयाच्या विधी समितीच्या सल्ल्यानुसार, कार्यकारी परिषदेच्या सहमतीने, विद्यापीठाच्या वतीने करार करील ; त्यात फेरबदल करील, तो पूर्ण करील किंवा रद्द करील.

(१६) ताबडतोब उपाययोजना करणे आवश्यक आहे असे कुलगुरुचे मत होईल अशा कोणत्याही निकडीच्या परिस्थितीत, तो प्रति-कुलपतीच्या नियंत्रणास अधीन राहून, त्यास आवश्यक वाटेल अशी उपाययोजना करील आणि त्यानंतर कार्यकारी परिषदेस आणि सर्वसाधारण नित्यक्रमास ज्या इतर प्राधिकाऱ्याने किंवा अधिकाऱ्याने उक्त बाबीसंबंधात कार्यवाही केली असती त्या प्राधिकाऱ्यास किंवा अधिकाऱ्यास, आपण केलेल्या उपाययोजनेबाबत लवकरात लवकर कळवील.

(१७) लगतपूर्वीच्या पोट-कलमान्वये कुलगुरुने केलेल्या कोणत्याही कार्यवाहीमुळे विद्यापीठाच्या सेवेतील कोणत्याही व्यक्तीवर, तिचा तोटा होईल अशा रितीने, परिणाम होईल त्या बाबतीत, अशा व्यक्तीस, अशी कार्यवाही केल्याबद्दलची नोटीस तिला मिळाली असेल त्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, कार्यकारी परिषदेकडे अपील करता येईल व कार्यकारी परिषद, तिच्या पुढील सभेत अपिलावर विचारविनिमय करील व अपिलाच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत आपला निर्णय देईल.

(१८) कार्यकारी परिषदेच्या अपील आदेशामुळे आपल्यावर अन्याय झाला आहे असे समजवणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, असा आदेश तिला कळविण्यात आल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, कुलपतीकडे अपील करता येईल व अशा अपिलांवरील कुलपतीचा निर्णय अंतिम असेल.

(१९) निकटपूर्वीच्या पोट-कलमाच्या तरतुदींस अधीन राहून, कुलगुरु विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांपैकी कोणत्याही कर्मचाऱ्यांची नेमणूक, निलंबन, त्याला काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे यासंबधात कार्यकारी परिषदेची आदेश अंमलात आणील.

(२०) कुलगुरु, या अधिनियमान्वये ठरवून देण्यात आले असतील व परिनियमाअन्वये प्रदान करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करील व त्यावर लादण्यात येतील अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

कुलसचिव **१८.** [१][(१) विद्यापीठाचा कुलसचिव हा विद्यापीठाचा पूर्णकालिक वेतनी अधिकारी असेल. तो, राज्य शासन, वेळोवेळी निश्चित करील अशा कालावधीकरिता, राज्य शासनाने नियुक्त केलेला शासनाच्या उप सचिवाच्या किंवा शासनाच्या अपर जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला राज्य शासनाचा प्रतिनियुक्तीवरील अधिकारी असेल. त्याच्या सेवेच्या अटी व शर्ती, राज्य शासन निश्चित करील त्याप्रमाणे असतील.]

[२][* * * * *]

[३][(४) विद्यापीठाचा कुलसचिव हा, विद्यापीठाच्या सामाईक शिक्क्यानिशी, अभिलेखांचा आणि विद्या परिषद, त्याच्याकडे वेळोवेळी जिचा प्रभार देईल अशा विद्यापीठाच्या अन्य मालमत्तेचा परिरक्षक असेल आणि विद्यापीठाचे सर्व भूमिविषयक अभिलेख अद्ययावत ठेवण्याची तसेच जतन, देखरेख व परिरक्षण करण्याची जबाबदारी कुलसचिवाची असेल. तो, कार्यकारी परिषदेचा, विद्यापरिषदेचा व विद्याविषयक कर्मचारीवर्ग आणि सहायक कुलसचिव या दर्जाचे अधिकारी व त्या पदाशी समतुल्य अथवा त्यावरील पदे धारण करणारे अधिकारी वगळून अन्य कर्मचाऱ्यांच्या निवड समित्यांचा पदसिद्ध सचिव असेल, आणि कामकाजासंबंधीची सर्व उपलब्ध माहिती त्यांच्यापुढे सादर करणे त्यास बंधनकारक असेल. तो विद्यापीठात प्रवेश मिळविण्यासंबधीचे अर्ज स्वीकारील व सर्व पाठ्यक्रम, अभ्यासक्रम आणि आवश्यक असलेली इतर माहिती यासंबंधी कायमस्वरुपाचे अभिलेख ठेवील.]

---

१. सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ याच्या कलम ३(क) अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ३(ख) अन्वये पोट-कलमे (२) व (३) वगळण्यात आली.

३. वरील अधिनियमाच्या कलम ३(ग) अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[१][* * * * *]

(६) कोणत्याही कारणास्तव रजेवर गेल्यामुळे कुलसचिवांच्या तात्पुरत्या अनुपस्थितित किंवा इतर कोणत्याही रीतीने रिकामी झालेली जागा भरण्यात येईतोपर्यंत, कुलगुरु, तीन महिन्यांपेक्षा अधिक नसेल अशा मुदतीसाठी, कुलसचिव म्हणून काम करण्याकरिता, कोणत्याही योग्य व्यक्तींची नेमणूक करील.

(७) कुलसचिव, विद्यार्थ्यांनी घेतलेले पाठ्यक्रम, मिळविलेली श्रेणी, त्यांना देण्यात आलेल्या पदव्या, त्यांनी मिळविलेली पारितोषिके किंवा इतर प्राविण्ये व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीची संबंधित असतील अशा इतर बाबी धरून, विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचे कायमस्वरुपाचे अभिलेख ठेवण्यास जबाबदार असेल.

(८) कुलसचिव, ह्या अधिनियमान्वये ठरवून देण्यात आले असतील किंवा परिनियमांद्वारे किंवा कुलगुरुद्वारे त्यास प्रदान करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करील आणि त्यांच्यावर लादण्यात येतील अशी इतर कर्तव्ये बजावील.

[२][(९) कुलसचिव हा कुलगुरुच्या अधीक्षणाधीन व नियंत्रणाधीन असेल. कुलसचिव हा, विद्यापीठाचा, विद्याविषयक कर्मचारीवर्ग आणि सहायक कुलसचिव या दर्जाचे अधिकारी व त्या पदाशी समतुल्य अथवा त्यावरील पदे धारण करणारे अधिकारी वगळून अन्य कर्मचाऱ्यांचा नियुक्ती व शिस्तविषयक प्राधिकारी असेल. कुलसचिव या निर्णयाने व्यथित झालेल्या व्यक्तीला असा निर्णय कळविण्यात आल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, कुलगुरुकडे अपील दाखल करता येईल.

(१०) विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकाऱ्याने या अधिनियमाच्या तरतुदींचे किंवा परिनियमांचे, विनियमांचे उल्लंघन करून एखादा निर्णय घेतला असल्याचे अथवा एखादी कार्यवाही केली असल्याचे कुलसचिवास वाटत असेल तर, तो अशा कोणत्याही निर्णयाच्या अथवा कार्यवाहीच्या परिणामांबाबत राज्य शासनाला माहिती देऊन, कुलगुरुला कळवण्यास जबाबदार असेल.]

**१९.** [३][(१) विद्यापीठाचा नियंत्रक हा विद्यापीठाचा पूर्णकालिक वेतनी अधिकारी असेल. तो, राज्य शासन वेळोवेळी निश्चित करील अशा मुदतीसाठी, राज्य शासनाने नियुक्त केलेल्या प्रतिनियुक्तीवरील भारतीय लेखा परीक्षा व लेखा सेवा अथवा महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा यातील अधिकारी असेल. त्याच्या सेवेच्या अटी व शर्ती, राज्य शासन निश्चित करील त्याप्रमाणे असतील.] **नियंत्रक.**

(२) नियंत्रक, कुलगुरुच्या सर्वसाधारण देखरेखीखाली व नियंत्रणाखाली विद्यापीठाची मालमत्ता धारण करील व मालमत्तेची व गुंतवणुकांची व्यवस्था पाहील ; आणि विद्यापीठाला त्याच्या वित्तीय धोरणासंबधात सल्ला देईल.

(३) नियंत्रक,—

(अ) अर्थसंकल्पात अधिकृत मंजुरी न देण्यात आलेला असा कोणताही खर्च विद्यापीठाकडून केला जाणार नाही याची निश्चिती करील ;

(ब) अर्थसंकल्पात प्राधिकृत केल्याप्रमाणेच खर्च केले जात आहेत यांची खात्री करून घेण्यास जबाबदार असेल. नवीन कार्यक्रम गतिमान करण्यासाठी बदलत्या गरजांमुळे किंवा इतर कोणत्याही कारणांमुळे कोणतेही फेरबदल करणे आवश्यक असेल तेव्हा, ते करणे व संबंधित प्राधिकाऱ्याकडून त्यांना त्वरेने मान्यता मिळविणे यास जबाबदार असेल ;

(क) ज्यामुळे या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदी किंवा त्याखाली तयार करण्यात आलेल्या कोणत्याही परिनियमांचा भंग होईल किंवा ज्यासाठी, या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये किंवा अशा कोणत्याही परिनियमांद्वारे तरतूद करणे आवश्यक असेल असा कोणताही खर्च करण्यास परवानगी देणार नाही ;

---

१. सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ याच्या कलम ३(घ) अन्वये पोट-कलम (५) वगळण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ३(ङ) अन्वये ही पोट-कलमे जादा दाखल करण्यात आली.

३. वरील अधिनियमाच्या कलम ४(क) अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

(ड) कोणत्याही विवक्षित प्रकरणी, अनधिकृत खर्चासंबंधात किंवा इतर वित्तीय नियमबाह्य वित्तीय गोष्टीसंबंधात खुलासा मागवण्यात यावा असे कार्यकारी परिषदेला प्रस्तावित करील आणि दोषी व्यक्तीविरूद्ध शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची शिफारस करील ;

[१][* * * *]

(५) नियंत्रक, या अधिनियमान्वये नमूद करण्यात आलेले असतील अशा किंवा परिनियमाद्वारे किंवा कुलगुरुकडून त्याला प्रदान करण्यात येतील अशा किंवा त्याच्यावर लादण्यात येतील अशा अन्य अधिकारांचा वापर करील व अशी अन्य कर्तव्ये पार पाडील.

विद्याशाखांचे अधिष्ठाते.

**२०.** (१) प्रत्येक विद्याशाखेचा अधिष्ठाता पूर्णकालिक वेतनी अधिकारी असेल व कार्यकारी परिषदेच्या शिफारशीवरून कुलगुरुकडून त्याची नियुक्ती करण्यात येईल.

(२) प्रत्येक विद्याशाखेचा अधिष्ठाता त्याच्या संबंधित विद्याशाखेचा मुख्य कार्यकारी व विद्याविषयक अधिकारी असेल व तिच्या प्रशासनासाठी तो कुलगुरुस जबाबदार असेल.

अधिष्ठात्यांची कर्तव्ये.

**२१.** (१) प्रत्येक विद्याशाखेचा अधिष्ठाता शिक्षण, संशोधन व विस्तार शिक्षण, निम्न शिक्षण, कृषी क्षेत्रे, संशोधन केंद्रे, रुग्णालये, रोग निदान केंद्रे इत्यादीच्या प्रशासनास व ती चालविण्यास जबाबदार असेल.

(२) प्रत्येक अधिष्ठाता—(एक) धोरणे आखील व विचारार्थ विद्यापरिषदेकडे सादर करील;

(दोन) विद्याशाखेच्या वेगवेगळ्या विभागांच्या कामाचे अहवाल कुलगुरूस देईल;

(तीन) विद्याशाखेच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची नोंदणी व प्रगती यांवर देखरेख ठेवील;

(चार) महाविद्यालये, शाळा व संशोधन संस्था यांसाठी नेमून देण्यात आलेल्या इमारती व साधनसामग्री यांच्या योग्य वापरासंबंधी कुलगुरुला जबाबदार असेल;

(पाच) तांत्रिक क्षेत्रातील समूचित अधिकारी व कर्मचारी यांच्याशी विचारविनिमय करून अर्थसंकल्प तयार करील;

(३) प्रत्येक अधिष्ठात्यास या अधिनियमान्वये ठरवून देण्यात आले असतील किंवा विहित करण्यात येतील असे इतर अधिकार असतील व अशी इतर कर्तव्ये तो पार पाडील.

विद्यापीठाचा संचालक.

**२२.** (१) विद्यापीठाचा संचालक विद्यापीठाचा पूर्णकालिक वेतनी अधिकारी असेल व कलम ५० अन्वये रचना केलेल्या निवड समितीच्या शिफारशीवरून कुलगुरुकडून त्याची नेमणूक करण्यात येईल.

(२) विद्यापीठाचा संचालक प्रत्यक्षतः कुलगुरुच्या हाताखाली काम करील व तो,—

(अ) महाविद्यालये व इतर शैक्षणिक संस्था यांची कामे योग्य रितीने होण्यास जबाबदार असेल आणि विद्यापीठाच्या सर्व घटक महाविद्यालयांमध्ये समन्वय साधून शैक्षणिक मार्गदर्शन करील व हे करताना तो घटक महाविद्यालयांचे सहयोगी अधिष्ठाते आणि इतर अधिकारी यांच्या निकट सहकार्याने काम करील;

---

१. सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ याच्या कलम ४(ख) अन्वये पोट-कलम (४) वगळण्यात आले.

(ब) तो जागतिकीकरणाच्या संदर्भात शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी आंतरराष्ट्रीय शिक्षण संस्थांशी संपर्क स्थापन करील तसेच विदेशी विद्यापीठांबरोबर परस्पर घेवाण-देवाण पद्धतीने शैक्षणिक कार्यक्रम विकसित करील;

(क) योग्य त्या शासकीय विभागामार्फत विद्याशाखा सुधार कार्यक्रमाची आखणी व अंमलबजावणी करील;

(ड) राज्यातील सर्व संशोधन केंद्रांची कार्ये योग्य रितीने पार पाडली जात आहेत हे पाहण्यास तो जबाबदार असेल व तो घटक महाविद्यालयाचे अधिष्ठाते व इतर अधिकारी यांच्या निकट सहकार्याने विद्यापीठात चालणाऱ्या सर्व संशोधनकार्याचा समन्वय करील; आणि

(ई) विद्यापीठाच्या सर्व विस्तार शिक्षण कार्यक्रमाच्या समन्वयाकरिता तो जबाबदार असेल व तो विद्याशाखांचे अधिष्ठाते व इतर अधिकारी यांच्या निकट सहकार्याने कार्याचा समन्वय करील.

सहयोगी अधिष्ठाता.

**२३.** (१) सहयोगी अधिष्ठाता विद्यापीठाचा पूर्णकालिक वेतनी अधिकारी असेल व कलम ५० अन्वये रचना करण्यात आलेल्या निवड समितीच्या शिफारशीवरून कुलगुरुकडून त्याची नेमणूक करण्यात येईल.

(२) सहयोगी अधिष्ठाता विहित केलेल्या अधिकारितेच्या हद्दींमध्ये सर्व स्तरांवरील अध्यापन, संशोधन आणि विस्तार शिक्षणविषयक कार्यक्रम चालविण्यासाठी जबाबदार असेल. तसेच तो घटक महाविद्यालयाचा प्राचार्यही असेल.

(३) सहयोगी अधिष्ठाता हा या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये घालून देण्यात येतील आणि विहित करण्यात येतील असा अधिकारांचा वापर करील व अशी कर्तव्ये पार पाडील.

विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या शर्ती ठरविण्याचा अधिकार.

**२४.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींस अधीन राहून विद्यापीठाच्या सर्व कर्मचाऱ्यांची पदनामे, अर्हता, सेवा प्रवेशाची पद्धत, वेतन, भत्ते व सेवेच्या इतर शर्ती व त्यांचे अधिकार व कर्तव्ये ही परिनियमांद्वारे वेळोवेळी ठरविण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

## प्रकरण चार

## विद्यापीठाची प्राधिकरणे

विद्यापीठाची प्राधिकरणे.

**२५.** विद्यापीठाची पुढील प्राधिकरणे असतील :—

(एक) कार्यकारी परिषद,

(दोन) विद्या परिषद,

(तीन) विद्या शाखा

(चार) अभ्यास मंडळे,

(पाच) परिनियमाद्वारे विद्यापीठाची प्राधिकरणे म्हणून जाहीर करण्यात येतील अशा विद्यापीठाच्या इतर संस्था.

विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणांचा सदस्य होण्यासाठी पात्रतेच्या शर्ती विनिर्दिष्ट करण्याचा शासनाचा अधिकार.

[1][**२५अ.** या अधिनियमाच्या कोणत्याही अन्य तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी कुलपतीशी विचारविनिमय करून, विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाचा सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी किंवा नामनिर्देशित होण्यासाठी पात्रतेच्या शर्ती, राज्य शासन, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील.]

कार्यकारी परिषद.

**२६.** (१) विद्यापीठाची कार्यकारी परिषद ही विद्यापीठाचे कार्यकारी प्राधिकरण असेल व ती पुढील सदस्यांची मिळून होईल :—

(एक) कुलगुरु—पदसिद्ध अध्यक्ष;

(दोन) पशुसंवर्धन आयुक्त किंवा त्याने नामनिर्दिष्ट केलेला अपर संचालक, पशुसंवर्धन;

१. सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ याच्या कलम ५ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

(तीन) मत्स्यव्यवसाय आयुक्त किंवा त्याने नामनिर्दिष्ट केलेली, महासंचालक, मत्स्यव्यवसाय याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाची नसेल, अशी व्यक्ती;

(चार) दुग्धव्यवसाय विकास आयुक्त किंवा अपर दुग्धव्यवसाय विकास आयुक्त किंवा त्याने नामनिर्दिष्ट केलेली सहसंचालक, दुग्धव्यवसाय विकास यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जाची नसेल अशी व्यक्ती;

(पाच) कृषी आयुक्त किंवा त्याने नामनिर्दिष्ट केलेली अपर कृषी संचालक याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाची नसेल अशी व्यक्ती;

(सहा) मुख्य प्रधान वनसंरक्षक किंवा त्याने नामनिर्दिष्ट केलेली, वन संरक्षकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाची नसेल, अशी व्यक्ती;

(सात) विद्यापीठाचा संचालक ;

(आठ) विद्याशाखेचे अधिष्ठाते ;

(नऊ) कुलगुरुशी विचारविनिमय करून, कुलपतीकडून नामनिर्दिष्ट करण्यात यावयाचा क्रियात्मक संशोधनाचा पुरेसा अनुभव असलेला पशुवैद्यक किंवा पशुविज्ञान क्षेत्रातील एक नामवंत शास्त्रज्ञ ;

(दहा) प्रति-कुलपतीकडून नामनिर्दिष्ट करण्यात यावयाचे दोन प्रगतिशील पशुधन पैदासकार किंवा मत्स्यबीज पैदासकार ;

(अकरा) भारतीय कृषी संशोधन परिषद किंवा भारतीय पशुवैद्यक संशोधन संस्था याचा एक प्रतिनिधी ;

(बारा) भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेचा एक प्रतिनिधी :

(तेरा) महाराष्ट्र विधानसभेने आपल्या सदस्यांमधून निवडलेले विधानसभेचे तीन सदस्य ;

(चौदा) महाराष्ट्र विधानपरिषदेने आपल्या सदस्यांमधून निवडलेले विधानपरिषदेचे दोन सदस्य ;

(पंधरा) प्रति-कुलपतीकडून नामनिर्दिष्ट करण्यात यावयाचे राज्याच्या महसुली विभागातील प्रत्येकी एक असे सहा जिल्हा परिषदांच्या पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय समितीचे अध्यक्ष ;

(सोळा) भारतीय पशुवैद्यक परिषदेकडून नामनिर्दिष्ट करण्यात यावयाचा एक प्रतिनिधी ;

(सतरा) कुलगुरुकडून नामनिर्दिष्ट करण्यात यावयाचा, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय व कुक्कुटपालन उद्योगातील प्रत्येकी एक प्रतिनिधी ;

(अठरा) कुलपतीकडून नामनिर्दिष्ट करण्यात यावयाची एक प्रमुख महिला समाजसेविका ;

(एकोणीस) प्रति-कुलपतीकडून नामनिर्दिष्ट करण्यात यावयाचा, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन व मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांकडून प्रत्येकी एक अध्यक्ष ;

कुलसचिव हा कार्यकारी परिषदेचा पदसिद्ध सचिव असेल.

(२) (अ) महाराष्ट्र विधानसभा किंवा महाराष्ट्र विधानपरिषद यांनी निवडलेला सदस्य हा सदस्य म्हणून त्यास निवडून देणाऱ्या संस्थेचा तो सदस्य असण्याचे बंद झाल्यावर, लगेच, कार्यकारी परिषदेचा सदस्य असण्याचेही बंद होईल ;

(ब) पोट-कलम (१) च्या खंड (पंधरा) अन्वये कार्यकारी परिषदेचा सदस्य होईल असा कोणत्याही जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन समितीचा अध्यक्ष, तो, उक्त समितीचा अध्यक्ष असण्याचे बंद झाल्याबरोबर किंवा कार्यकारी परिषदेवरील नियुक्तीच्या तारखेपासून एक वर्षाची मुदत संपल्यानंतर या दोहोपैंकी जे आधी घडेल त्यावेळी, कार्यकारी परिषदेचा सदस्य असण्याचे बंद होईल.

(क) खंड (एकोणीस) अन्वये कार्यकारी परिषदेचा सदस्य होईल असा दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन किंवा मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांचा अध्यक्ष, तो, उक्त समितीचा अध्यक्ष, असण्याचे बंद झाल्याबरोबर कार्यकारी परिषदेचा सदस्य असण्याचे बंद होईल.

(ड) पदसिद्ध सदस्यांव्यतिरिक्त कार्यकारी परिषदेमधील इतर सदस्यांचा पदावधी [1][पाच वर्षांचा] असेल.

कार्यकारी परिषदेचे अधिकार कर्तव्ये.

**२७.** ह्या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये घालून देण्यात येतील अशा शर्तीस अधीन राहून, कार्यकारी परिषद पुढील अधिकारांचा वापर करील व पुढील कर्तव्ये पार पाडील :—

(एक) विद्यापीठाकडे कोणते कार्यक्रम असावेत याची स्थूलरुपाने आखणी करणे ;

(दोन) विद्यापीठाच्या वार्षिक अहवालावर चर्चा करणे आणि त्याचा आढावा घेणे व त्यावर सूचना करणे ;

(तीन) विद्यापीठाच्या वार्षिक वित्तीय अंदाजांवर विचार करणे व ते तयार करणे आणि त्यांवर सूचना करणे ;

(चार) राज्य शासनाच्या मान्यतेने, विद्यापीठ मालमत्तेच्या तारणावर, विद्यापीठाच्या प्रयोजनांसाठी कर्ज घेणे ;

(पाच) परिनियमांस अधीन राहून, विद्यापीठाच्या वतीने मृत्युपत्रदाने, देणग्या आणि विद्यापीठाकडे हस्तांतरित करण्यात आलेली कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता स्वीकारणे ;

(सहा) विद्यापीठाच्या वतीने कोणत्याही स्थावर किंवा जंगम मालमत्तेचे हस्तांतरण करणे ;

(सात) विद्यार्थ्यांसाठी घटक महाविद्यालये, विभाग, वसतिगृहे, संशोधन केंद्रे, कृषिक्षेत्रे, शाळा, ग्रंथालये, प्रयोगशाळा व प्रात्याक्षिक केंद्रे सुरु करणे व चालवणे आणि विद्यार्थ्यांना, कर्मचाऱ्यांना इतर सोयी पुरवणे ;

(आठ) विद्यापीठाचे आर्थिक व्यवहार, लेखे व गुंतवणूक यांची व्यवस्था ठेवणे व त्यांचे नियमन करणे ;

(नऊ) विहित करण्यात येईल त्याप्रमाणे फी व इतर आकार वेळोवेळी निश्चित करणे, त्यांची मागणी करणे व ते स्वीकारणे ;

(दहा) संशोधन कार्य चालविण्यासाठी आणि ज्ञानामध्ये प्रगती करण्यासाठी व त्याचा प्रसार करण्यासाठी तिला योग्य वाटेल अशा ज्ञान शाखेतील आणि पाठ्यक्रमांतील शिक्षण, अध्यापन, व प्रशिक्षण यांसाठी तरतूद करणे ;

(अकरा) महाविद्यालये आणि पदव्युत्तर संस्था यांना मान्यता देणे ;

(बारा) घटक महाविद्यालयांतील व मान्यताप्राप्त संस्थांतील शैक्षणिक दर्जास मान्यता देणे व तो राखण्यात येत आहे याबद्दल खात्री करून घेणे ;

(तेरा) उच्च शिक्षण व संशोधन संस्था यांना मान्यता देणे आणि त्यांची मान्यता काढून घेणे ;

---

१. सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ याच्या कलम ६ अन्वये " तीन वर्षांचा " या मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(चौदा) पुढील गोष्टींसाठी तरतूद करणे :—

(अ) ग्रामीण जनतेचे विस्तार शिक्षण ;

(ब) विद्यापीठाचे, संबंधित शासकीय विभागांचे, जिल्हा परिषदांचे कर्मचारी तसेच इतर क्षेत्रीय कर्मचारी सेवेत असताना त्यांना प्रशिक्षण देणे ;

(क) शारीरिक व लष्करी प्रशिक्षण देणे ;

(ड) क्रीडा व व्यायाम मंडळे ;

(ई) विद्यार्थ्यांचे कल्याण ;

(पंधरा) मान्यताप्राप्त संस्थांच्या तपासणीची व्यवस्था करणे व ती करण्याबद्दल निदेश देणे व त्यांची कार्यक्षमता राहावी आणि त्यांच्या कर्मचारीवर्गाच्या योग्य सेवाशर्तीची निश्चिती करण्यासाठी म्हणून अनुदेश देणे ; आणि अशा अनुदेशांकडे दुर्लक्ष करण्यात आल्यास, त्यांच्या मान्यता देण्यासंबंधीच्या शर्तीस फेरफार करण्याविषयी किंवा तिला योग्य वाटेल अशी इतर उपाययोजना करण्याविषयी शिफारस करणे ;

(सोळा) घटक महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त संस्था यांतील कर्मचारीवर्गाची वेतनश्रेणी आणि त्यांच्या सेवेच्या शर्ती निश्चित करणे व त्यांचे पालन होत आहे याची खात्री करून घेणे ;

(सतरा) परिनियम व विनियम करणे, त्यात सुधारणा करणे किंवा त्यांचे निरसन करणे ;

(अठरा) विनियम स्वीकारणे, नाकारणे किंवा विद्या परिषदेकडे किंवा इतर कोणत्याही प्राधिकरणाकडे ते विचारार्थ परत पाठविणे ;

(एकोणीस) परीक्षक नेमणे, त्याचे काही परिश्रमिक असल्यास ते निश्चित करणे आणि विद्यापीठाच्या परीक्षा व इतर चाचणी परीक्षा घेण्याची व त्याचे निकाल प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करणे ;

(वीस) विद्यापीठ यथोचितरीत्या चालावे म्हणून तिला आवश्यक वाटेल अशी, स्थायी किंवा तात्पुरती, मंडळे व समित्या नेमणे व त्यांची रचना, कामे आणि मुदत निश्चित करून देणे ;

(एकवीस) तिला योग्य वाटतील असे आपल्या अधिकारांपैकी कोणतेही अधिकार कुलगुरुस किंवा विद्यापीठाच्या किंवा तिने नेमलेल्या मंडळाच्या किंवा समितीच्या इतर अधिकाऱ्यास विनियमांद्वारे प्रदान करणे ;

(बावीस) विद्यापीठाच्या सामायिक शिक्क्याचा नमुना ठरविणे व त्याची अभिरक्षा आणि त्याच्या वापराचे नियमन यासंबंधी तरतूद करणे.

(तेवीस) अधिछात्रवृत्या (प्रवासी अधिछात्रवृत्यांसह), शिष्यवृत्या, छात्रवृत्या, पदके व पारितोषिके मंजूर करणे ;

(चोवीस) पदवी, पदविका, प्रमाणपत्रे व इतर विद्याविषयक विशेषोपाधी बहाल करण्यासंबधी कुलपतीस शिफारस करणे ;

(पंचवीस) सन्मानदर्शक पदव्या किंवा विद्याविषयक इतर विशेषोपाधी मंजूर करणे ;

(सव्वीस) विद्यापीठ व त्याच्या नियंत्रणाखालील महाविद्यालये व संस्था यांच्या विद्यार्थ्यांच्या व कर्मचारीवर्गाच्या गरजा भागविण्यासाठी ग्राहक सहकारी संस्थांची तरतूद करणे ;

(सत्तावीस) ह्या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये आणि परिनियमांद्वारे तिला प्रदान करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करणे व तिच्यावर लादण्यात येतील अशी इतर कर्तव्ये पार पाडणे ;

(अठ्ठावीस) या अधिनियमाच्या किंवा परिनियमांच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक आहेत अशा व ज्याकरिता या अधिनियमात किंवा परिनियमांत अन्यथा कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही, अशा विद्यापीठाच्या सर्व अधिकारांचा व इतर सर्व अधिकारांचा वापर करणे.

**२८.** (१) कार्यकारी परिषदेची सभा, कुलगुरु ठरवील अशा तारखांना, दर दोन महिन्यांतून एकदा किंवा आवश्यक वाटेल त्याप्रमाणे, त्यापेक्षा अधिक वेळा भरविण्यात येईल. परिषदेच्या सर्व सभा विद्यापीठाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी घेण्यात येतील ; परंतु, कुलपतीच्या पूर्वमान्यतेने, तिची कोणतीही सभा इतर कोणत्याही ठिकाणी घेता येईल. कार्यकारी परिषदेच्या सभा.

(२) पोट-कलम (१) अन्वये कुलगुरुकडून कार्यकारी परिषदेच्या सभेसाठी तारीख निश्चित करण्यात येईल तेव्हा कुलसचिव अशा सभेची, लेखी नोटीस परिषदेच्या सदस्यांना देईल.

**२९.** (१) विद्यापीठाची विद्यापरिषद ही विद्यापीठाचे सल्लागार मंडळ म्हणून काम करील आणि तिला सर्व विद्याविषयक, संशोधनविषयक व विस्तार शिक्षणविषयक बाबींवर कुलगुरुला व कार्यकारी परिषदेला सल्ला देण्याचा अधिकार असेल. विद्यापरिषद.

(२) विद्यापरिषद पुढील सदस्यांची मिळून होईल :—

(एक) कुलगुरु-पदसिद्ध अध्यक्ष,

(दोन) विद्यापीठाचा संचालक,

(तीन) प्रत्येक विद्याशाखेचा अधिष्ठाता,

(चार) सहयोगी अधिष्ठाते,

(पाच) प्रत्येक विभाग प्रमुख,

(सहा) भारतीय पशुवैद्यक परिषदेचा एक प्रतिनिधी,

(सात) विभाग प्रमुखाखेरीज, विद्याशाखेने निवडलेला प्रत्येक विद्याशाखेतील विद्याविषयक कर्मचारीवर्गाचा एक सदस्य.

कुलसचिव हा विद्यापरिषदेचा पदसिद्ध सचिव असेल.

(३) विद्यापरिषदेस, पशुविज्ञानाच्या विविध अंगाचे समुचित ज्ञान किंवा प्रत्यक्ष अनुभव असलेल्या चारपेक्षा अधिक नसतील इतक्या तज्ज्ञांना, विहित करण्यात येईल अशा मुदतीसाठी व अशा रितीने स्वीकृत करून घेता येईल आणि अशा स्वीकृत सदस्यांना परिषदेच्या कामकाजात भाग घेण्याचा व तसेच परिषदेच्या इतर कोणत्याही सदस्यांप्रमाणे मतदानाचा अधिकार असेल.

(४) विद्यापरिषदेची सभा प्रत्येक सहामाही सत्रभागाच्या प्रारंभापूर्वी निदान एकदा तरी भरेल.

**३०.** (१) ह्या अधिनियमाच्या अथवा परिनियमांच्या तरतुदींद्वारे किंवा तदन्वये घालून देण्यात येतील अशा शर्तीस अधीन राहून, विधानपरिषद, विद्यापीठातील पाठ्यक्रम, अभ्यासक्रम, अध्यापन, संशोधन व विस्तार शिक्षण यांचे आयोजन करणे व ते चालवणे यासंबंधात अभ्यास करील व त्याबाबत शिफारशी करील. विद्यापरिषदेचे अधिकार व कर्तव्ये.

(२) पूर्ववर्ती तरतुदींच्या सामान्यतेस बाध येऊ न देता, विद्यापरिषद पुढील अधिकारांचा वापर करील व पुढील कर्तव्ये पार पाडील :—

(एक) महाविद्यालये विभाग, संशोधन केंद्रे, ग्रंथालये, प्रयोगशाळा, प्रात्यक्षिक केंद्रे यांच्या स्थापनेसंबंधी आणि पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय यांच्या विकासाच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक असेल असे इतर कार्य यासंबंधी प्रस्ताव करणे ;

(दोन) कलम १३ मध्ये विनिर्दिष्ट केलेले विद्याविषयक अधिकारी, प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक, अधिव्याख्याता, प्रयोग निर्देशक यांची आणि विस्तार शिक्षण धरून, संशोधन केंद्रांच्या ठिकाणी पदे निर्माण करण्यासाठी व उक्त पदांसाठी आवश्यक असलेल्या अर्हता, त्यांची कर्तव्ये, वित्तलब्धी व सेवेच्या इतर शर्ती यासंबंधी कार्यकारी परिषदेस शिफारशी करणे ;

(तीन) अध्यापन, संशोधन व विस्तार शिक्षण या विभागांची रचना व पुनर्रचना यासंबंधीच्या योजना तयार करणे, त्यांत फेरबदल करणे व त्यांचे पुनरीक्षण करणे;

(चार) संबंधित विद्याशाखा व अभ्यासमंडळे यांच्याशी विचारविनिमय करून, पदव्या, पदविका व प्रमाणपत्रे देणाऱ्या अभ्यासक्रमाविषयी विनियम करणे ;

(पाच) विद्यापीठात विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासंबंधी विनियम करणे ;

(सहा) विद्यापीठाकडून घेण्यात येणाऱ्या परीक्षांबाबत आणि ज्या शर्तींवर विद्यार्थ्यांना अशा परीक्षांना बसता येईल त्या शर्तींबाबत विनियम करणे ;

(सात) पदव्युत्तर अध्यापन, संशोधन व विस्तार शिक्षण यांबाबत कार्यकारी परिषदेस शिफारशी करणे ;

(आठ) विविध विद्याशाखांना विषय वाटून देण्यासंबंधी प्रस्ताव मांडणे ;

(नऊ) या अधिनियमाच्या आणि परिनियमांच्या तरतुदींद्वारे किंवा तदन्वये प्रदान करण्यात येतील किंवा सोपवण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करणे व अशी इतर कर्तव्ये बजाविणे.

विद्याशाखा व अभ्यास मंडळ.

**३१.** (१) विद्यापीठ पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही विद्याशाखा, तसेच परिनियमांनुसार वेळोवेळी ज्यांची तरतूद करण्यात येईल अशा इतर विद्याशाखा व अभ्यास मंडळ यांची रचना करील :—

(एक) पशुवैद्यकशास्त्र,

(दोन) मत्स्यविज्ञान,

(तीन) दुग्धव्यवसाय तंत्रशास्त्र,

(२) प्रत्येक विद्याशाखेचे विषय परिनियमांद्वारे निश्चित करण्यात येतील.

(३) विद्यापरिषदेच्या शिफारशीसह व कार्यकारी परिषदेच्या मान्यतेस अधीन राहून, प्रत्येक विद्याशाखेकडे निरनिराळ्या ज्ञानशाखांतील अभ्यासक्रमांचे अध्यापन, संशोधन कार्य आणि विस्तार शिक्षण कार्यक्रम यांचा कार्यभार राहील.

(४) प्रत्येक विद्याशाखेचा एक अधिष्ठाता असेल. तो मुख्य विद्याविषयक अधिकारी असेल व नियम आणि परिनियमांच्या यथोचित अनुपालनास जबाबदार असेल. तो विद्याशाखेचा पदसिद्ध अध्यक्ष असेल.

(५) प्रत्येक विद्याशाखा पुढील सदस्यांची मिळून होईलः—

(एक) विद्याशाखेचा अधिष्ठाता–पदसिद्ध अध्यक्ष ;

(दोन) संबंधित विद्याशाखेच्या प्रत्येक घटक महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता;

(तीन) विभागप्रमुख;

(चार) विभाग प्रमुखाखेरीज, विभागांच्या विद्याविषयक कर्मचारीवर्गातील सदस्यांनी निवडून द्यावयाचा एक प्राध्यापक;

(पाच) संबद्ध विद्याशाखेतील मान्यताप्राप्त संस्थांचा प्राचार्य;

(सहा) संबंधित गटांनी निवडावयाचा एक सहयोगी प्राध्यापक व दोन सहायक प्राध्यापक.

(६) निवडण्यात आलेल्या सदस्यांचा पदावधी तीन वर्षे असेल.

(७) विस्तार शिक्षण कार्यकर्त्यांच्या योग्य प्रतिनिधित्वाची तरतूद करण्यासाठी, विद्याशाखेस, शासनाचे चारपेक्षा अधिक नसणारे अधिकारी, किंवा कोणत्याही जिल्हा परिषदेचे अधिकारी, सदस्य म्हणून स्वीकृत करता येतील; आणि विहित करण्यात येईल अशा मुदतीसाठी व अशा रितीने सदस्यांची निवड करण्यात येईल.

(८) प्रत्येक विद्याशाखेची सभा एका सहामाहीत किमान एकदा भरेल, परंतु उक्त सभा विद्याशाखेच्या शिफारशींचा विद्यापरिषदेला विचार करता यावा म्हणून विद्यापरिषदेच्या सभेच्या पुरेशी अगोदर घेण्यात येईल.

**३२.** निर्णय घेण्याच्या विद्यापरिषदेच्या अधिकारास अधीन राहून, विद्याशाखांना सर्व प्रशासकीय व तंत्रविषयक बाबींचा विचार करता येईल व त्याबाबत विद्यापरिषदेला शिफारशी करता येतील. शक्य तेथवर, विद्यापरिषद, निर्णयाच्या बाबतीत संबंधित विद्याशाखेचे मार्गदर्शन घेईल. प्रत्येक विद्याशाखेचा अधिष्ठाता, धोरणविषयक बाबी वगळता, विद्याशाखेने अंगीकारलेल्या ठरावावर कार्यवाही करील; परंतु कुलगुरुस त्याप्रमाणे कळविणे आवश्यक असेल. प्रत्येक विद्याशाखेस, विहित करण्यात येईल अशा विषयांसाठी व अशा रितीने, अभ्यास मंडळाची रचना करता येईल व उक्त अभ्यासमंडळ हे विहित करण्यात येईल इतक्या सदस्यांचे मिळून होईल व विहित करण्यात येईल तेवढ्या कालावधीसाठी राहील. विद्याशाखेचे इतर अधिकार व कर्तव्ये ही विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील. विद्याशाखांचे अधिकार व कर्तव्ये.

प्रकरण पाच

## परिनियम आणि विनियम

**३३.** या अधिनियमाच्या तरतुदींस अधीन राहून परिनियमात पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :— परिनियम.

(अ) विद्यापीठाच्या प्राधिकरणाची रचना, अधिकार व कर्तव्ये आणि इतर संस्था अशी प्राधिकरणे असल्याचे घोषित करणे;

(ब) कुलगुरुच्या सेवेच्या इतर शर्ती आणि त्यांचे अधिकार व कर्तव्ये;

(क) विद्यापीठाच्या निरनिराळ्या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांची, पदनामे, अर्हता, सेवाप्रवेशाची पद्धती, वेतने, भत्ते आणि त्यांच्या सेवेच्या इतर शर्ती आणि त्यांचे अधिकार व कर्तव्ये;

(ड) विद्याशाखांची रचना, पुनर्रचना किंवा त्या विसर्जित करणे आणि त्यांचे अधिकार व कर्तव्ये;

(ई) विद्याशाखांमध्ये अध्यापन विभागांची स्थापना;

(फ) मानद आणि विद्याविषयक विशेषोपाधी प्रदान करणे व काढून घेणे;

(ग) विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांच्या फायद्यांकरिता निवृत्तिवेतन किंवा भविष्य निर्वाह निधी किंवा विमा योजना या सर्व किंवा यांपैकी एक किंवा अधिक योजना चालू करणे;

(ह) संलग्न महाविद्यालयांतील व मान्यताप्राप्त संस्थांतील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक, संशोधन सहायक, पशुवैद्यकीय अधिकारी, क्षेत्र प्रयोगनिर्देशक आणि विद्याविषयक इतर प्रवर्गातील कर्मचारी यांची पदनामे, अर्हता, सेवाप्रवेशांची पद्धती, वेतन, भत्ते आणि त्यांच्या सेवेच्या इतर शर्ती;

(आय) स्नातकांची नोंदणी करणे व स्नातकांची नोंदवही ठेवणे;

(ज) इतर विद्यापीठांच्या किंवा शैक्षणिक संस्थांच्या परीक्षांना, विद्यापीठाच्या तत्सम परीक्षांच्या समतुल्य म्हणून मान्यता देणे;

(के) या अधिनियमान्वये विहित करावयाची किंवा विहित करता येईल अशी कोणतीही इतर बाब;

(ल) या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी आवश्यक असलेली इतर कोणतीही बाब;

परिनियम कसे करण्यात येतील.

**३४.** (१) विद्यापीठाची कार्यकारी परिषद ही, या अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत राहून नवीन परिनियम तयार करील व नियत दिवसापासून तीन महिन्यांच्या आत कुलपतींच्या मान्यतेसाठी ते सादर करील.

(२) कार्यकारी परिषदेस, या कलमात यानंतर तरतूद केलेल्या रीतीने वेळोवेळी परिनियम करता येतील किंवा त्यात सुधारणा करता येतील किंवा ते रद्द करता येतील.

(३) कार्यकारी परिषदेस, एकतर स्वतःहून किंवा कुलगुरुनी प्रस्ताव केल्यावरुन, परिनियमाचा मसुदा विचारात घेता येईल :

परंतु, शैक्षणिक बाबीसंबंधातील कोणत्याही परिनियमांचा कार्यकारी परिषदेकडून विचार होण्यापूर्वी विद्या परिषदेकडून त्यांची तपासणी करण्यात येईल.

(४) कार्यकारी परिषदेने संमत केलेला प्रत्येक परिनियम कुलपतीस सादर करण्यात येईल व त्यास त्यावर आपली संमती देता येईल किंवा संमती रोखून ठेवता येईल किंवा फेरविचारासाठी तो कार्यकारी परिषदेकडे परत पाठविता येईल.

(५) कुलपती संमती देईपर्यंत कार्यकारी परिषदेने संमत केलेला कोणताही परिनियम वैध असणार नाही किंवा तो अंमलात येणार नाही.

(६) या कलमात काहीही असले तरी, कोणत्याही विद्यमान परिनियमात सुधारणा करणे किंवा नवीन परिनियम करणे आवश्यक आहे असे राज्य शासनाचे मत होईल तर, राज्य शासनाला कुलपतीच्या सहमतीने, अशा परिनियमात सुधारणा करता येईल किंवा नवीन परिनियम करता येईल व तो राजपत्रात अधिसूचित करता येईल.

विनियम.

**३५.** (१) कार्यकारी परिषद, विद्या परिषद आणि विद्याशाखा यांना, हा अधिनियम व त्या अन्वये करण्यात आलेले परिनियम यांच्याशी सुसंगत असतील असे पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबीसंबंधी विनियम करता येतील :—

(अ) त्यांच्या सभांमध्ये (गणपूर्तीसाठी आवश्यक असलेली संस्था धरुन) अनुसरावयाची आणि त्यांचे कामकाज चालविण्याची कार्यपद्धती ;

(ब) हा अधिनियम किंवा परिनियम यांनुसार ज्याबाबींची विनियमांद्वारे तरतूद करणे आवश्यक असेल अशा बाबींची तरतूद ;

(क) केवळ अशा प्राधिकरणांशी संबंधित असतील अशा सर्व बाबींची किंवा अशा प्राधिकरणांच्या मते या अधिनियमान्वये किंवा परिनियमांअन्वये त्यांच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी व त्यांची कर्तव्ये पार पाडण्यासाठी ज्या बाबींची तरतूद करणे आवश्यक असेल अशा बाबींची तरतूद.

(२) विद्यापीठाचे प्रत्येक प्राधिकरण, उक्त प्राधिकरणाच्या सदस्यांना सभांच्या तारखांबद्दल आणि सभांमध्ये चालविण्यात येईल अशा कामकाजाबद्दल नोटीस देण्याची आणि सभांच्या कामकाजाचे अभिलेख ठेवण्याची तरतूद करणारे विनियम करील.

(३) विद्यापरिषदेस, परिनियमांच्या तरतुदींस आणि कार्यकारी परिषदेच्या मान्यतेस अधीन राहून, विद्यापीठाचे अभ्यासक्रम, परीक्षांची पद्धत व विद्यापीठाच्या पदव्या व पदविका यांसाठी संबंधित विद्याशाखेकडून त्याचे मसुदे मिळाल्यानंतर तरतूद करण्यासाठी विनियम करता येतील.

(४) कार्यकारी परिषदेस, विद्याशाखेकडून मिळालेल्या विनियमांच्या कोणत्याही मसुद्यांस, कोणत्याही फेरबदलासह किंवा त्याशिवाय मान्यता देता येईल किंवा तो नाकारता येईल किंवा अधिक विचारविनिमयांसाठी म्हणून विद्यापरिषदेच्या सूचनांसह, तो, विद्याशाखेकडे परत पाठवता येईल.

(५) कार्यकारी परिषदेस, ती विनिर्दिष्ट करील अशा रीतीने, या कलमान्वये कोणत्याही प्राधिकरणाने केलेल्या कोणत्याही, विनियमात सुधारणा करण्याबद्दल किंवा अशा कोणत्याही विनियमाच्या विलोपनाबद्दल निदेश देता येईल ; अशा कोणत्याही सुधारणेमुळे किंवा विलोपनामुळे, उक्त विनियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

## प्रकरण सहा

## मान्यता

**३६.** (१) कार्यकारी परिषदेस, उच्च पदव्यासंबंधातील विद्यापीठाच्या गरजा अंशतः पूर्ण करण्यासाठी आणि पशुसंवर्धन व मत्स्यव्यवसायविज्ञान यातील, निम्नस्तर शिक्षण देण्यासाठी तसेच विद्यापीठाव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्राधिकरणाच्या व्यवस्थापनाखाली असलेल्या कोणत्याही, संशोधन किंवा विशेष अभ्यास संस्थांना, शिक्षणाची व संशोधनाची सोय करणाऱ्या संस्था म्हणून, मान्यता देण्याचा अधिकार असेल.

संशोधन व विशेष अभ्यास संस्थांना व निम्नस्तरीय पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय शिक्षण संस्थांना मान्यता.

(२) ह्या कलमान्वये मान्यता मिळण्यासाठी अर्ज करणारी संस्था, आपले आवेदनपत्र, कुलसचिवांकडे पाठवील आणि अशा पत्रात पुढील बाबींसंबंधी संपूर्ण माहिती देईल :—

(अ) व्यवस्थापक मंडळाची रचना व त्यातील कर्मचारीवर्ग ;

(ब) ज्या विषयांच्या व पाठ्यक्रमांच्या संबंधात मान्यता मिळवावयाची असेल ते विषय व पाठ्यक्रम ;

(क) जागा, साधनसामग्री व ज्यांची सोय करण्यात आली असेल अशा किंवा सोय करण्याचे योजिले असेल अशा विद्यार्थ्यांची संख्या ;

(ड) कर्मचाऱ्यांची संख्या, त्यांच्या अर्हता व वेतने आणि त्यांनी केलेले संशोधनकार्य ;

(ई) आकारण्यात येणारी किंवा आकारण्याचे योजिलेली फी आणि इमारती, जमीन व साधनसामग्री यांवरील भांडवली खर्चासाठी व संस्था सातत्याने चालू राहण्यासाठी व तिच्या कार्यक्षम कामकाजासाठी केलेली वित्तीय तरतूद.

(३) पोट-कलम (२) अन्वये पाठविलेले पत्र मिळाल्यावर, कार्यकारी परिषद,—

(अ) याबाबत तिने प्राधिकृत केलेल्या सक्षम व्यक्तीने त्या ठिकाणी जाऊन चौकशी करावी असा निदेश देईल ;

(ब) तिला आवश्यक वाटेल अशी आणखी चौकशी करील ;

(क) असा अर्ज पूर्णतः किंवा अंशतः मंजूर किंवा नामंजूर करण्यात यावा किंवा कसे या प्रश्नावर विद्यापरिषदेशी विचारविनिमय केल्यानंतर, खंड (अ) व (ब) अन्वये केलेल्या कोणत्याही चौकशीचे निष्कर्ष नमूद करून आपल्या मतांची नोंद करील.

(४) कार्यकारी परिषदेस, विद्यापीठाखेरीज कोणत्याही प्राधिकरणाच्या व्यवस्थापनाखालील निम्नस्तर पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय यासारख्या शिक्षण देणाऱ्या कोणत्याही संस्थेला किंवा कृषिक्षेत्रासही व संलग्न कामे यासंबंधातील शिक्षण व संशोधन यांसह निम्नस्तर शिक्षणाच्या सोयी पुरवण्याच्या प्रयोजनार्थ मान्यताप्राप्त संस्था म्हणून, मान्यता देण्याचा अधिकार असेल. संशोधनाच्या अथवा विशेष अभ्यासाच्या कोणत्याही संस्थेने मान्यता मिळण्यासाठी अर्ज करणे आणि तिला मान्यता देणे अथवा मान्यता देण्याचे नाकारणे यासंबंधी पोट-कलम (२) व (३) यांत विहित केलेली कार्यपद्धती ही, योग्य त्या फेरफारांसह, पशुवैद्यक, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय शिक्षणाच्या कोणत्याही संस्थेने मान्यता मिळण्यासाठी अर्ज करणे व तिला मान्यता देणे अथवा मान्यता देण्याचे नाकारणे यासाठी लागू असेल.

संस्थांची तपासणी व अहवाल.

**३७.** (१) विद्यापीठाच्या गरजांच्या अनुषंगाने, एखाद्या महाविद्यालयाची किंवा संस्थेची कार्यक्षमता व आवश्यकता अजमावणे शक्य व्हावे यासाठी आवश्यक वाटतील असे अहवाल, विवरणपत्रे आणि इतर माहिती, प्रत्येक मान्यताप्राप्त संस्था कार्यकारी परिषदेस पुरवील.

(२) कार्यकारी परिषद, याबाबतीत ती प्राधिकृत करील अशा व्यक्तीकडून वेळोवेळी अशा प्रत्येक महाविद्यालयाची किंवा संस्थेची तपासणी करवील.

(३) कार्यकारी परिषदेस, निकटपूर्वीच्या दोन कलमांमध्ये निर्दिष्ट केलेल्या बाबींच्या संबंधात, तिला आवश्यक वाटेल अशी कारवाई विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत करण्याबद्दल कोणत्याही मान्यताप्राप्त संस्थेस फर्माविता येईल.

मान्यता काढून घेणे

**३८.** (१) एखाद्या संस्थेने तिच्या मान्यतेच्या शर्तींपैकी कोणत्याही शर्तीचे पालन करण्यात कसूर केली असेल किंवा पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय शिक्षण किंवा संशोधन याच्या हितसंबंधांस बाध येईल अशा रीतीने संस्था चालविण्यात येत असेल तर मान्यतेमुळे अशा संस्थेस देण्यात आलेले अधिकार कार्यकारी परिषदेस काढून घेता येतील किंवा कोणत्याही मुदतीपर्यंत निलंबित करता येतील.

(२) अशा रीतीने अधिकार काढून घेण्याचा किंवा निलंबित करण्याबाबतचा प्रस्ताव, प्रथमतः विद्यापरिषदेतच मांडण्यात येईल. असा प्रस्ताव मांडण्याचा इरादा असलेला विद्यापरिषदेचा सदस्य त्याबद्दल नोटीस देईल आणि ज्या कारणांमुळे तो मांडण्यात आला असेल ती कारणे लेखी नमूद करील.

(३) उक्त प्रस्ताव विचारात घेण्यापूर्वी, विद्यापरिषद पोट-कलम (२) मध्ये नमूद केलेल्या नोटिशीची व लेखी निवेदनाची प्रत, संबंधित संस्थेच्या प्रमुखास पाठवील व त्यासोबत सूचनेत निर्दिष्ट केलेल्या मुदतीत संस्थेच्या वतीने सादर केलेले कोणतेही लेखी अभिवेदन विद्यापरिषद विचारात घेईल अशी सूचना पाठवील :

परंतु, अशा रीतीने विनिर्दिष्ट केलेली मुदत, आवश्यक वाटल्यास विद्यापरिषदेला वाढविता येईल.

(४) अभिवेदन मिळाल्यावर किंवा पोट-कलम (३) मध्ये उल्लेख केलेली मुदत संपल्यावर, विद्यापरिषद प्रस्तावाची नोटीस, निवेदन आणि अभिवेदन विचारात घेतल्यानंतर, त्या बाबतीत करावयाच्या कार्यवाहीबाबत निर्णय घेईल, विद्यापरिषदेने, मान्यता काढून घेण्याची किंवा निलंबित करण्याची कार्यवाही करण्यात यावी असे ठरवल्यास, विद्यापरिषद त्या प्रयोजनासाठी एक ठराव मंजूर करील आणि त्यात ज्या कारणांसाठी अशी मान्यता काढून घेण्यात किंवा निलंबित करण्यात यावयाची असेल ती कारणे नमूद करील, आणि कार्यकारी परिषदेला तशा अर्थाची शिफारस करील.

(५) विद्यापरिषदेने केलेली शिफारस मिळाल्यावर कार्यकारी परिषद, तिला आवश्यक वाटेल अशी आणखी चौकशी केल्यानंतर, मान्यता काढून घेण्यात यावी किंवा विनिर्दिष्ट मुदतीसाठी निलंबित करण्यात यावी याबाबतचा निर्णय घेईल.

## प्रकरण सात

## अध्यापन, संशोधन व विस्तार शिक्षण

**३९.** (१) कलम ४ च्या पोट-कलम (१) मधील तरतुदींना अनुसरून विद्यापीठ, त्याच्या घटक महाविद्यालयांमार्फत अध्यापन, संशोधन आणि विस्तार शिक्षण कार्यक्रम हाती घेईल. अध्यापन कार्यक्रम

(२) विद्यापीठ वेळोवेळी निदेश देईल त्याप्रमाणे विद्यापीठाची घटक महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त संस्था यांच्या अध्यापनाचे स्वरूप व रचना सारखीच असेल.

(३) निरनिराळ्या विद्याशाखांच्या गरजा भागविण्याकरिता विद्यापीठ, गरजेनुसार जादा महाविद्यालये व संस्था स्थापन करील.

(४) विद्यापीठ, गरजेनुसार जादा प्रशिक्षण केंद्रे चालू करील किंवा त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या कोणत्याही प्रशिक्षण संस्था किंवा पाठ्यक्रम किंवा वर्ग कायमचे किंवा तात्पुरते बंद करील.

**४०.** विद्यापीठ, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विज्ञान, विस्तार शिक्षण आणि निरंतर शिक्षण सेवा यांसारखे कार्यक्रम स्थापन करील आणि या अधिनियमाच्या आणि परिनियमांच्या तरतुदींस अधीन राहून संशोधनाच्या निष्कर्षावर आधारित असलेली उपयुक्त माहिती ग्रामीण क्षेत्रातील शेतकऱ्यांना व इतर लोकांना त्यांच्या समस्या सोडविण्यास सहाय्य करण्यासाठी, उपलब्ध करून देईल. विस्तार शिक्षण पथके स्थापन करून किंवा त्यांचा वापर करून, विद्यार्थी, विस्तार कार्यकर्ते, पशुधन पैदासकार आणि इतर ग्रामीण लोक यांच्या फायद्यासाठी प्रात्याक्षिके व प्रशिक्षण कार्यक्रम चालवील. विद्यमान पशुमहाविद्यालयात दुग्ध उत्पादन, मत्स्यउत्पादन वाढविणे आणि संकरित जाती व स्थानिक पैदाशीत सुधारणा करणे हा सर्व विस्तार कार्याचा मुख्य उद्देश राहील आणि या कार्याचा विद्यापीठ अधिक्षेत्रातील इतर समुचित अभिकरणांच्या इतर कार्याशी समन्वय करण्यात येईल. विस्तार शिक्षण.

संशोधन कार्यक्रम.

**४१.** (१) विद्यापीठ, संशोधन सेवा स्थापन करील. विद्यापीठाची संशोधन व प्रयोग केंद्र विद्यापीठास योग्य वाटेल अशा रितीने आणि असे योग्य ते फेरबदल करून, विद्यापीठाकडून, त्यांच्या घटक संशोधन संस्था म्हणून चालविण्यात येतील.

(२) विद्यापीठ, आवश्यकतेनुसार मूलभूत व उपयोजित अशा दोन्ही प्रकारच्या संशोधनासाठी विद्यापीठात योग्य त्या ठिकाणी प्रयोग केंद्रे स्थापन करील किंवा त्यांची पुनर्रचना करील.

(३) विद्यापीठास कोणत्याही वेळी त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे संशोधन केंद्रांपैकी कोणतेही संशोधन केंद्र कायमचे किंवा तात्पुरते बंद करता येईल आणि त्याचा संकोच किंवा विस्तार करता येईल.

अध्यापन संशोधन व विस्तार शिक्षण यांचे समन्वयन आणि कार्य व अभ्यासक्रम आणि सर्वसेवा यांची सांगड.

**४२.** (१) विद्यापीठाच्या समुचित अधिकाऱ्यांशी विचारविनिमय करून, कुलगुरु, विद्यापीठाचे अध्यापन, संशोधन व विस्तार शिक्षण कार्य यांच्या पूर्ण समन्वयासाठी, आवश्यक असेल अशी उपाययोजना करण्यास जबाबदार असेल.

(२) पशुसंवर्धन व मत्स्यव्यवसाय विज्ञानाशी संबंधित औद्योगिक, भौतिक व सामाजिक शास्त्रांमध्ये नवीन माहिती विकसित व्हावी आणि तंत्रशास्त्र अद्ययावत व्हावे या दृष्टीने जास्तीत जास्त प्रगती करण्याजोगी परिस्थिती निर्माण झालेली आहे आणि या सुधारणा अभ्यासक्रमात, तसेच शैक्षणिक कार्यक्रमात प्रतिबिंबित होत आहेत आणि त्यामुळे विद्यापीठ क्षेत्रामध्ये त्यासंबंधी जाणिव निर्माण होत असून व्यवहारात शक्य असेल तेथे त्याचा अंगीकारही होत आहे याबाबत समुचित अधिकाऱ्यांमार्फत अंमलबजावणी होत आहे, हे पहाण्यास कुलगुरु जबाबदार असेल.

(३) विद्यापीठांचे समुचित कार्यकारी अधिकारी व कर्मचारीवर्ग यांच्यामार्फत काम करीत असताना कुलगुरु विद्यापीठाच्या विविध विद्याशाखांमधील कार्याची, अनावश्यक पुनरावृत्ती टाळण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना उत्कृष्ट पाठ्यक्रम पुरविण्यासाठी व विद्यापीठाची साधनसामग्री व प्रज्ञा यांद्वारे शक्य असेल तेथवर विद्यापीठाच्या निरनिराळ्या विद्याशाखांमध्ये असणारे पाठ्यक्रम व अभ्यासक्रम यांच्यामध्ये समुचित परस्परसंबंध करण्यास जबाबदार असेल.

(४) राज्याच्या सर्वसाधारण गरजा लक्षात घेऊन, विद्यापीठ त्याच्या संशोधनाच्या आणि विस्तार शिक्षणाच्या कार्यक्रमाचा विकास करील आणि विशेषतः पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास या कार्यात गुंतलेल्या राज्य शासनाच्या विभागास योग्य तो तंत्रविषयक पाठिंबा आणि जरूर तेव्हा सल्ला देईल.

(५) या अधिनियमात काहिही अंतर्भूत असले तरी, संपूर्ण राज्याच्या हिताच्या दृष्टीने, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, कोणताही विशेषीकृत कार्यक्रम, अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट अशा कालावधीसाठी व अशा अटी व शर्तींच्या अधीन, मान्यताप्राप्त संस्थेकडे सोपवील.

## प्रकरण आठ

## वित्त व्यवस्था आणि लेखे

विद्यापीठ निधी.

**४३.** (१) विद्यापीठ, विद्यापीठ निधी या नावाचा एक निधी प्रस्थापित करील.

(२) पुढील रकमा विद्यापीठ निधीचा भाग म्हणून असतील किंवा त्या विद्यापीठ निधीच्या खाती जमा करण्यात येतीलः—

(अ) शासनाने दिलेले कोणतेही अंशदान किंवा अनुदान;

(ब) फी, आकार आणि विक्रीपासून येणारे उत्पन्न धरून, सर्व साधनांपासून येणारे विद्यापीठाचे उत्पन्न;

(क) विद्यापीठास मिळालेल्या कोणत्याही मृत्यूपत्रित देणग्या, देणग्या, स्थायी दाने आणि इतर अनुदाने.

(३) राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने, विद्यापीठ निधीचा कोणताही भाग वेळोवेळी विद्यापीठ, विद्यापीठाच्या लेख्यात वेगळ्या शीर्षाखाली जमा करील. परंतु अशा रीतीने ज्या उद्दीष्टांसाठी विशेष निधी उभारण्यात आला असेल त्याच्याशी स्पष्टपणे संबंधित असतील अशाच रकमा अशा विशेष शीर्षाखाली जमा किंवा खर्च खाती टाकण्यात येतील.

१९३४ चा २. (४) विद्यापीठ निधी हा, कार्यकारी परिषदेच्या स्वेच्छानिर्णयानुसार, स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये किंवा भारताच्या रिझर्व्ह बँकेबाबत अधिनियम, १९३४ यात व्याख्या केल्याप्रमाणे असलेल्या, बँक १९४९ चा १०. व्यवसाय विनियमन अधिनियम, १९४९ याचे कलम २२ अन्वये रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने दिलेला परवाना धारण करीत असेल अशा कोणत्याही अनुसूचित बँकेत किंवा त्या प्रयोजनार्थ राज्य शासनाने मान्यता दिलेल्या सहकारी बँकेत, ठेवण्यात येईल किंवा भारतीय विश्वस्त व्यवस्था १८८२ चा २. अधिनियम, १८८२ अन्वये प्राधिकृत केलेल्या रोख्यांमध्ये किंवा पाच लाख रुपयांच्या कमाल मर्यादेस अधीन राहून, विद्यापीठाच्या किंवा कोणत्याही संलग्न महाविद्यालयाच्या किंवा मान्यताप्राप्त संस्थांच्या प्रयोजनांसाठी प्रस्थापित करण्यात आलेल्या ग्राहक सहकारी संस्थांच्या शेअर्समध्ये किंवा त्यांना कर्जे देऊन, गुंतविण्यात येईल.

**४४.** (१) विद्यापीठ, राज्य शासन निश्चित करील अशा रीतीने, विद्यापीठाच्या जमा रकमा व खर्च यांचे वार्षिक वित्तीय अंदाज तयार करील. वित्तीय अंदाज.

(२) कार्यकारी परिषद अशा रीतीने तयार केलेले अंदाज विचारात घेईल आणि ते फेरफारांसह किंवा फेरफारांवाचून मान्य करील.

(३) विद्यापीठ, कार्यकारी परिषदेने मान्य केलेले असे अंदाज राज्य शासनाकडून विद्यापीठास अधिसूचित करण्यात येईल अशा तारखेस राज्य शासनास मंजुरीसाठी सादर करील.

(४) राज्य शासनास उक्त अंदाजांच्या संबंधात त्याला योग्य वाटतील असे आदेश देता येतील आणि ते विद्यापीठास कळविता येतील व विद्यापीठ अशा आदेशांची अंमलबजावणी करील.

(५) विद्यापीठाचे वित्तीय अंदाज आणि लेखा विवरण तयार करण्यासाठी नियंत्रक जबाबदार राहील.

**४५.** विद्यापीठ, राज्य शासनाने दिलेल्या कोणत्याही अनुदानांसंबधात, राज्य शासन वेळोवेळी फर्माविल अशी विवरणपत्रे, विवरणे, लेखे, अहवाल आणि इतर माहिती राज्य शासनाला सादर करील आणि राज्य शासन वेळोवेळी निदेश देईल अशा मुदतीत आणि अशा रीतीने, राज्य शासनाने दिलेल्या कोणत्याही अनुदानांच्या वापरांसंबंधात, राज्य शासन निदेश देईल अशी कार्यवाही करील आणि अशी आणखी विवरणपत्रे, विवरणे, लेखे, अहवाल किंवा इतर माहिती सादर करील. दिलेल्या अनुदानासंबंधीची विवरणपत्रे, विवरणे शासनाला सादर करणे.

**४६.** राज्य शासनाच्या किंवा त्याने या बाबतीत प्राधिकार दिलेल्या अधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीशिवाय विद्यापीठ— शासनाचे वित्तीय नियंत्रण.

(अ) कलम १३ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे इतर अधिकाऱ्यांची किंवा विभागप्रमुखांची किंवा प्राध्यापकांची किंवा तत्सम हुद्याच्या कोणत्याही अधिकाऱ्यांची कोणतीही नवीन पदे निर्माण करणार नाही;

(ब) अध्यापकीय व अध्यापनेतर प्रवर्गातील कोणत्याही अधिकाऱ्यांचे व इतर कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते, सेवानिवृत्तिनंतरचे व इतर लाभ यांत फेरफार करणार नाही; किंवा

(क) सानुग्रह प्रदान, शिष्यवृत्त्यांच्या दरांतील वाढ आणि अशा अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना दिले जाणारे वित्तीय भार अभिप्रेत असणारे इतर लाभ यांसह, कोणतेही विशेष वेतन, भत्ता आणि कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त पारिश्रमिक देणार नाही.

लेखे व लेखापरीक्षा.

**४७.** (१) विद्यापीठाचे वार्षिक लेखे कुलगुरुच्या निदेशाखाली नियंत्रकाकडून तयार करण्यात येतील व विद्यापीठाला कोणत्याही साधनांद्वारे उपार्जित होणारा व मिळणारा सर्व पैसा आणि विद्यापीठाने संवितरित केलेल्या व दिलेल्या सर्व रकमा यांची लेख्यांमध्ये नोंद करण्यात येईल.

(२) कुलगुरु वार्षिक लेखे आणि ताळेबंद राज्य शासनाला सादर करील व राज्य शासन ते नियुक्त करील अशा लेखापरिक्षकाकडून त्यांची लेखापरीक्षा करण्याची व्यवस्था करील. लेखापरीक्षा करण्यात आल्यावर उक्त लेखे मुद्रित करण्यात येतील आणि लेखापरीक्षेच्या अहवालाच्या प्रतीसह त्याच्या प्रती कुलगुरु कार्यकारी परिषदेला, प्रति-कुलपतीला व कुलपतीला लेखापरीक्षा केलेले लेखे ज्या तारखेस कुलगुरुस मिळतील त्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत सादर करील.

(३) कार्यकारी परिषद, लेख्यांची एक प्रत व लेखापरीक्षेचे अहवाल राज्य शासनास, वित्तीय वर्षाच्या समाप्तीपासून नऊ महिन्यांच्या आत सादर करील आणि राज्य शासन ते राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्याची व्यवस्था करील.

(४) कार्यकारी परिषद, पोट-कलम (३) मध्ये निर्देशिलेले लेखे व लेखापरीक्षा अहवालाची प्रत याबरोबरच दरवर्षी, राज्य शासनास, विद्यापीठाद्वारे अगोदरच्या लेखापरीक्षा अहवालातील ज्यावर कार्यवाही करण्यात आली आहे, ज्यांवरील कार्यवाहीस प्रारंभ करण्यात आलेला आहे आणि ज्यांवरील कार्यवाहीस अद्याप प्रारंभ केलेला नाही अशा बाबींची संख्या दर्शविणारे विवरणपत्रही सादर करील.

लेखे ठेवण्यासाठी निदेश.

**४८.** विवक्षित अशा विशिष्ट कार्याशी संबंधित लेखे कोणत्या पद्धतीने ठेवण्यात यावेत याविषयी विद्यापीठास निदेश देण्यास राज्य शासन सक्षम असेल आणि विद्यापीठ, राज्य शासनाने दिलेल्या निदेशानुसार कार्यवाही करील.

प्रकरण नऊ

## संकीर्ण तरतूद

विवक्षित नेमणुका करारावर करणे.

**४९.** (१) या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्या व्यतिरिक्त, विद्यापीठाच्या प्रत्येक वेतनी अधिकाऱ्याची व विद्याविषयक कर्मचारी वर्गातील व्यक्तीची नेमणूक लेखी करारान्वये करण्यात येईल. उक्त करार, कुलसचिवाकडे ठेवण्यात येईल व त्याची एक प्रत, संबंधित कर्मचाऱ्यास देण्यात येईल.

(२) अशा कोणत्याही कर्मचाऱ्यास विद्यापीठातील किंवा विद्यापीठाबाहेरील कोणत्याही कामाकरिता, परिनियमान्वये तरतूद करण्यात येईल त्या व्यातिरिक्त, कोणतेही पारिश्रमिक मिळणार नाही.

(३) विद्यापीठ व त्याचा कोणताही कर्मचारी, यांच्यामधील करारातून उद्‌भवणारा कोणताही विवाद, संबंधित कर्मचाऱ्याने विनंती केली असता, कार्यकारी परिषदेने नेमलेला एक सदस्य, संबंधित कर्मचाऱ्याने नामनिर्दिष्ट केलेला एक सदस्य आणि कुलपतीने नेमलेला एक पंच यांचे मिळून होईल अशा एका लवादी न्यायाधिकरणाकडे पाठविण्यात येईल; न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम असेल आणि न्यायाधिकरणाने ज्याबाबत निर्णय दिला असेल अशा बाबीसंबंधात कोणत्याही

१९९६ चा २६. दिवाणी न्यायालयात कोणताही दावा दाखल करता येणार नाही. अशी प्रत्येक विनंती ही, लवादाबाबत अधिनियम, १९९६ याच्या अर्थानुसार, ह्या कलमाच्या अटीवर लवादासाठी सदर निवेदन असल्याचे मानण्यात येईल आणि उक्त अधिनियमाच्या तरतुदी त्याप्रमाणे लागू होतील.

निवड समितीच्या शिफारशींवरून विद्याविषयक कर्मचारीवर्गातील व्यक्तींची नेमणूक करणे.

**५०.** (१) याबाबतीत करण्यात आलेल्या परिनियमांच्या तरतुदींनुसार त्या प्रयोजनासाठी रचना करण्यात आलेल्या निवड समितीच्या शिफारशीवरून असेल त्याशिवाय, विद्यापीठाने कोणत्याही व्यक्तीची विद्याविषयक कर्मचारीवर्गातील व्यक्ती म्हणून नेमणूक करता कामा नयेः

परंतु, विद्यापीठाचे संचालक, सहयोगी अधिष्ठाता, विभाग प्रमुख आणि प्राध्यापक यांच्या नेमणुका कार्यकारी परिषदेद्वारे रचना करावयाच्या निवड समितीद्वारे करण्यात येतील.

(२) पोट-कलम (१) च्या परंतुकात निर्दिष्ट करण्यात आलेली निवड समिती पुढील व्यक्तींची मिळून होईल :—

(एक) विद्यापीठाचा कुलगुरु;

(दोन) कार्यकारी परिषदेच्या अशासकीय सदस्यांमधून प्रति-कुलपतीने नामनिर्देशित करावयाचा एक अशासकीय सदस्य;

(तीन) कुलगुरुने नामनिर्देशित करावयाचे दोन तज्ज्ञ;

(चार) भारतीय कृषि संशोधन परिषदेचे दोन प्रतिनिधी; यापैकी एक सदस्य, ज्या विशिष्ट क्षेत्रासाठी सेवा भरती करावयाची असेल त्या क्षेत्रातील विशेषज्ञ असेल;

(पाच) संबंधित विद्याशाखेचा अधिष्ठाता.

(३) कुलगुरु हा निवड समितीचा प्रमुख म्हणून काम पाहील.

विद्यापीठातील सेवा व पदे यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांसाठी विशेष तरतूद.

**५१.** (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असेल तरी, राज्य शासनाला, अनुसूचित जातीच्या व अनुसूचित जमातीच्या व्यक्तींसाठी आणि इतर मागासवर्गांच्या व्यक्तींसाठी ज्या प्रवर्गातील पदे राखून ठेवण्यात येतील अशा पदांचे प्रवर्ग, त्यांच्याकरिता राखून ठेवावयाच्या पदांची टक्केवारी आणि अशा राखीव जागांशी संबंधित कोणत्याही अन्य बाबी यांच्या संबंधात, त्यास आवश्यक वाटतील असे निदेश विद्यापीठाला देण्याचा अधिकार असेल, आणि विद्यापीठ अशा निदेशांचे पालन करील.

पद रिकामे होणे.

**५२.** (१) अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्याशिवाय, विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाच्या किंवा संस्थेच्या कोणत्याही सदस्यास, कुलसचिवांमार्फत, कुलगुरुच्या नावे पत्र पाठवून, आपल्या पदाचा राजीनामा देता येईल आणि कुलगुरुने राजीनामा स्वीकारल्यावर अशा सदस्याचे पद रिकामे होईल.

परंतु, अशा कोणत्याही प्राधिकरणाच्या किंवा संस्थेच्या कोणत्याही सदस्याची नियुक्ती किंवा नामनिर्देशन कुलपतीमार्फत करण्यात आले असेल त्याबाबतीत, अशा कोणत्याही सदस्यास, कुलपतींच्या नावे पत्र पाठवून आपल्या पदाचा राजीनामा देता येईल आणि कुलपतीकडून त्याचा राजीनामा स्वीकारला गेल्यानंतर त्याचा राजीनामा परिणामक्षम होईल व त्याचे पद रिक्त होईल.

(२) विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाचा किंवा संस्थेचा कोणताही सदस्य, ज्यात नैतिक अधःपाताचा अंतर्भाव होत असेल अशा अपराधाबद्दल न्यायालयाकडून त्यास दोषी ठरविण्यात आल्यावर, उक्त प्राधिकरणाचा किंवा संस्थेचा सदस्य असण्याचे बंद होईल.

तात्पुरत्या रिकाम्या जागा भरणे.

**५३.** जेव्हा विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाच्या किंवा संस्थेच्या पदसिद्ध सदस्यांव्यतिरिक्त इतर सदस्याचे पद, अशा सदस्याच्या पदाची मुदत संपण्यापूर्वी, रिकामे होईल तेव्हा असे रिक्त पद, सोयीस्कर होईल तितक्या लवकर, एखाद्या सदस्याची यथास्थिती, निवडणूक, नामनिर्देशन, नेमणूक करून किंवा त्याला स्वीकृत करून भरण्यात येईल; आणि असा सदस्य, ज्याच्या जागी निवडणूक, नामनिर्देशन, नेमणूक किंवा स्वीकृती करून त्यास घेण्यात आले असेल तो सदस्य जर उक्त पद रिकामे झाले नसते तर ज्या मुदतीपर्यंत पदावर राहिला असता त्या मुदतीपर्यंत पद धारण करील.

केवळ सदोष रचना, रिक्त पदे इत्यांदींमुळे कृती व कार्यवाही विधिअग्राह्य नसणे.

**५४.** कार्यकारी परिषद किंवा विद्यापरिषद किंवा विद्यापीठाचे इतर कोणतेही प्राधिकरण किंवा संस्था यांची यथोचित रीत्या रचना करण्यात आलेली नसली किंवा त्यांच्या रचनेत किंवा पुनर्रचनेत कोणताही दोष असला तरी आणि अशा कोणत्याही प्राधिकरणाच्या किंवा संस्थेच्या सदस्यांची जागा रिक्त असली तरी केवळ अशा कारणांवरुन विद्यापीठाच्या अशा प्राधिकरणाच्या किंवा संस्थेचे कोणतेही कृत्य किंवा कामकाज विधिअग्राह्य ठरणार नाही.

अर्थविवरणा संबंधातील प्रश्न व विद्यापीठाच्या संस्थेच्या रचनेसंबंधातील विवाद.

**५५.** या अधिनियमाच्या किंवा कोणत्याही परिनियमाच्या किंवा विनियमाच्या कोणत्याही तरतुदींच्या अर्थविवरणासंबंधी किंवा एखादी व्यक्ती, विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाचा किंवा संस्थेचा सदस्य म्हणून योग्य रीतीने नामनिर्देशित करण्यात, निवडण्यात, नेमण्यात, स्वीकृत करण्यात आली आहे किंवा असा सदस्य झाली आहे किंवा सदस्य होण्याचा तिला हक्क आहे किंवा कसे याविषयी कोणताही प्रश्न उद्‌भवेल तर, उक्त बाब, तिचा प्रत्यक्ष परिणाम झालेल्या कोणत्याही व्यक्तीने किंवा संस्थेने विनंतीअर्ज केला असता किंवा कुलगुरुस, स्वतः होऊन कुलपतीकडे पाठविता येईल आणि कुलपती संबंधित व्यक्तीस किंवा संस्थेस आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर आणि त्यास आवश्यक वाटेल असा सल्ला घेतल्यानंतर उक्त प्रश्नाचा निर्णय करील व त्याचा निर्णय अंतिम असेल.

विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांमध्ये शिस्त राखणे.

**५६.** (१) विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांच्या संबंधातील शिस्त आणि शिस्तभंगाची कार्यवाही याबाबतीतील सर्व अधिकार, कुलगुरुकडे निहित असतील.

(२) कुलगुरुस, आपल्या अधिकारांचा वापर करीत असताना, आदेशाद्वारे, कोणत्याही विद्यार्थ्यास किंवा विद्यार्थ्यांना निष्कासित करण्यात यावे किंवा विनिर्दिष्ट मुदतीसाठी त्यांस/त्यांना काढून टाकण्यात यावे, किंवा महाविद्यालयात, संस्थेत किंवा विद्यापीठाच्या विभागात एका किंवा अधिक पाठ्यक्रमांमध्ये, विनिर्दिष्ट मुदतीसाठी, प्रवेश देण्यात येऊ नये असा, किंवा तीनशे रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या दंडाची शिक्षा देण्यात यावी असा, किंवा विद्यापीठ, महाविद्यालय, संस्था किंवा विभाग यांच्याकडून घेतल्या जाणाऱ्या परीक्षेस किंवा परीक्षांना बसण्यास, पाच वर्षांपेक्षा अधिक असेल इतक्या विनिर्दिष्ट मुदतीसाठी मनाई करण्यात यावी, असा किंवा तो विद्यार्थी ज्या परीक्षेला किंवा परीक्षांना बसला असेल किंवा बसले असतील त्या एक किंवा अनेक परीक्षांतील संबंधित विद्यार्थ्यांचा किंवा विद्यार्थ्याचा निकाल पुढे ढकलण्यात यावा किंवा रद्द करण्यात यावा असा निदेश देता येईल.

(३) कुलगुरुच्या अधिकारास बाध न आणता महाविद्यालयांचे व संस्थांचे प्राचार्य आणि विद्यापीठातील अध्यापन विभागांचे प्रमुख यांना, त्यांच्या संबंधित प्रभाराखालील विद्यार्थ्यांच्या संबंधात योग्य ती शिस्त राखण्यासाठी आवश्यक असे अधिकार वापरण्याचा प्राधिकार असेल.

(४) कुलगुरु, कार्यकारी परिषदेच्या मान्यतेस अधीन राहून, विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांची शिस्त व उचित वर्तणूक याबाबत नियम करील. हे नियम, सर्व महाविद्यालयांच्या व संस्थांच्या विद्यार्थ्यांना लागू असतील आणि प्रवेश देण्याच्या वेळी प्रत्येक विद्यार्थ्याला अशा नियमांची एक प्रत पुरविण्यात येईल.

(५) कुलगुरुंची शिस्तविषयक अधिकारिता, विद्यापीठाशी संलग्न असलेल्या सर्व महाविद्यालयांच्या व विद्यापीठाने मान्यता दिलेल्या सर्व संस्थांच्या, विद्यार्थ्यांना लागू असेल.

**५७.** (१) विद्यापीठाचे हितसंबंध योग्यरित्या जपण्यात आले आहेत याची खात्री करणे, विद्यापीठाच्या प्रत्येक प्राधिकरणाचे व अधिकाऱ्याचे कर्तव्य असेल. हानीसाठी प्राधिकरण व अधिकारी जबाबदार असणे.

(२) या अधिनियमाच्या किंवा परिनियमांच्या किंवा विनियमांच्या तरतुदींशी सुसंगत नसेल अशा, विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाच्या किंवा अधिकाऱ्याच्या कोणत्याही कृत्यामुळे,–ते सद्भावनेने केले असेल ते खेरीजकरून,–किंवा अधिनियम, परिनियम किंवा विनियम यास अनुसरून कृत्य करण्यात झालेल्या कोणत्याही कसुरीमुळे किंवा त्याने, जाणूनबुजून दुर्लक्ष किंवा कसूर केल्यामुळे, विद्यापीठाचे नुकसान किंवा हानी झाल्याचे आढळून आले तर; असे नुकसान किंवा हानी प्राधिकरणाकडून किंवा त्याच्या संबंधित सदस्यांकडून किंवा यथास्थिति, संबंधित अधिकाऱ्याकडून परिनियमांद्वारे विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार, वसूल केले जाण्यास पात्र ठरेल.

**५८.** (१) विद्यापीठाने किंवा त्याच्या कोणत्याही प्राधिकरणांनी, निकायांनी किंवा अधिकाऱ्यांनी सद्भावनापूर्वक केलेली सर्व कृत्ये व दिलेले सर्व आदेश हे अंतिम असतील; आणि त्यानुसार सद्भावपूर्वक व ह्या अधिनियमास व त्या अन्वये करण्यात आलेल्या परिनियमांस व विनियमांस अनुसरुन केल्याचे किंवा दिल्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल किंवा आदेशाबद्दल विद्यापीठाविरुद्ध किंवा त्याच्या प्राधिकरणाविरूद्ध, निकायाविरुद्ध किंवा अधिकाऱ्यांविरुद्ध कोणताही दावा किंवा कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही किंवा चालू ठेवण्यात येणार नाही किंवा त्याजकडून कोणत्याही नुकसानभरपाईची मागणी करण्यात येणार नाही. कृत्यांचे व आदेशांचे संरक्षण.

**५९.** ह्या अधिनियमान्वये किंवा परिनियमान्वये विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणास कोणतीही समिती नियुक्त करण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला असेल त्या बाबतीत, अशी समिती अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्याशिवाय संबंधित प्राधिकरण प्रत्येक बाबतीत ठरवील त्याप्रमाणे, त्याच्या सदस्यांची किंवा अंशतः त्यांचे सदस्य व अंशतः इतर व्यक्ती यांची मिळून होईल. समित्यांची रचना.

**६०.** विद्यापीठाचा वार्षिक अहवाल हा कुलगुरुंच्या निदेशान्वये तयार करण्यात येईल आणि तो विहित करण्यात येईल अशा तारखेस किंवा त्यापूर्वी त्यांच्याकडून कार्यकारी परिषदेला सादर करण्यात येईल. कार्यकारी परिषदेने मान्य केल्याप्रमाणे अहवाल कुलगुरुकडून कुलपतीला व राज्य शासनाला सादर करण्यात येईल. राज्य शासन, उक्त अहवाल राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्याची व्यवस्था करील. वार्षिक अहवाल.

**६१.** राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, पहिल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट असलेली महाविद्यालये, संस्था, संशोधन केंद्रे किंवा प्रशिक्षण केंद्रे यांच्यात भर घालण्याचा, अनुसूचीत सुधारणा करण्याचा किंवा सूचीमधून ते वगळण्याचा अधिकार असेल. पहिल्या अनुसूचीत सुधारणा करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

प्रकरण दहा

## महाविद्यालये, संस्था, संशोधन केंद्रे, प्रशिक्षण केंद्रे आणि निधी, कर्मचारीवर्ग आणि मालमत्ता इत्यादींचे हस्तांतरण

महाविद्यालये संस्था, संशोधन केंद्रे, प्रशिक्षण केंद्रे आणि मालमत्ता इत्यादींचे हस्तांतरण.

**६२.** (१) महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम, १९८३, आणि त्याखाली केलेले परिनियम, विनियम आणि आदेश यांत काहीही अंतर्भूत असले तरी नियत दिवसाला आणि त्या दिवसापासून- (१९८३ चा महा. ४१.)

(अ) पशुवैद्यकीय विज्ञान, मत्स्यव्यवसाय (सागरी जीवशास्त्रासह) आणि कृषि विद्याशाखेतील पशुसंवर्धन शाखा या विद्याशाखा, प्रत्येक कृषि विद्यापीठाच्या विभागांसह या विद्यापीठाकडे हस्तांतरित करण्यात येतील आणि त्या त्या विद्यापीठाच्या संबंधित विज्ञानांच्या घटक विद्याशाखा आणि विभाग असल्याचे मानण्यात येईल ;

(ब) पहिल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली प्रत्येक कृषि विद्यापीठाची महाविद्यालये, संस्था, संशोधन केंद्रे, प्रशिक्षण केंद्रे व कृषिक्षेत्रे आणि राज्य शासनाच्या विभागाच्या नियंत्रणाखाली असलेली संशोधन केंद्रे आणि प्रशिक्षण केंद्रे, विद्यापीठाकडे हस्तांतरित करण्यात येतील आणि ती विद्यापीठाची घटक महाविद्यालये, संशोधन केंद्रे, प्रशिक्षण केंद्रे आणि कृषिक्षेत्र मानण्यात येतील ;

(क) वरील खंड (अ) आणि (ब) मध्ये निर्देश केलेली महाविद्यालये, संस्था, विद्यालयाचा, विभाग, संशोधन केंद्रे, प्रशिक्षण केंद्रे आणि कृषिक्षेत्रे यांचे नियंत्रण आणि व्यवस्थापन आणि कृषि विद्यापीठे व राज्य शासन यांची त्यांच्याशी संबंधित सर्व मालमत्ता, मत्ता व दायित्वे विद्यापीठाकडे हस्तांतरित व निहित होतील ;

(ड) कृषि विद्यापीठांपैकी कोणत्याही कृषि विद्यापीठाच्या पशुवैद्यकीय, दुग्धव्यवसाय आणि मत्स्यव्यवसाय शाखांनी स्वीकारलेली किंवा त्यांना प्राप्त झालेली आणि नियत दिवसाच्या लगतपूर्वी त्यांनी धारण केलेली कोणतीही धर्मदाने, या अधिनियमाखाली, विद्यापीठाने स्वीकारलेली, त्याला प्राप्त झालेली किंवा त्याने धारण केलेली असल्याचे मानण्यात येईल आणि ज्या शर्तीवर अशी धर्मदाने स्वीकारण्यात आली किंवा प्राप्त झाली किंवा धारण केली गेली अशा सर्व शर्ती, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींशी त्या विसंगत असल्या तरीही, या अधिनियमांतर्गत विधिग्राह्य मानण्यात येतील ;

(ई) ज्यामध्ये कृषि विद्यापीठाच्या पशुवैद्यकीय, दुग्धव्यवसाय आणि मत्स्यव्यवसाय महाविद्यालयांच्या नावे कोणतीही देणगी, दान, शर्ती व न्यास यांचा समावेश आहे असे नियत दिवसापूर्वी करण्यात आलेले कोणतेही मृत्युपत्र, विलेख किंवा इतर दस्तऐवज यांचा अर्थ, नियत दिवशी आणि त्या तारखेपासून जणूकाही त्यामध्ये कृषि विद्यापीठाऐवजी या विद्यापीठाचे नाव आहे असे समजून लावण्यात येईल ;

(फ) प्रत्येक कृषि विद्यापीठाच्या पशुसंवर्धन, पशुवैद्यक विज्ञान, दुग्धव्यवसाय तंत्रशास्त्र आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान यांच्याशी संबंधित संशोधन प्रकल्प आणि शासन व प्रत्येक कृषि विद्यापीठ यांची संशोधन केंद्रे विद्यापीठाकडे हस्तांतरित आणि निहित होतील.

घटक महाविद्यालय किंवा विद्याशाखा म्हणून स्थापन करण्यात येणारे नवीन महाविद्यालय किंवा विद्याशाखा.

**६३.** नियत दिवशी व त्या दिवसापासून या विद्यापीठाचे घटक महाविद्यालय किंवा विद्याशाखा म्हणून असेल त्याशिवाय, पशुवैद्यकीय विज्ञान, दुग्धव्यवसाय तंत्रशास्त्र व मत्स्यव्यवसाय विज्ञान आणि संलग्न विज्ञान यांचे शिक्षण देणारे कोणतेही नवीन महाविद्यालय किंवा विद्याशाखा स्थापन करण्यात येणार नाही.

विवक्षित कर्मचाऱ्यांची सेवा हस्तांतरित करणे.

**६४.** (१) नियत दिवसाच्या लगतपूर्वी, कलम ६० च्या पोट-कलम (१), खंड (ब) मध्ये निर्देश केलेल्या कृषि विद्यापीठाच्या महाविद्यालयांत किंवा संस्थांत सेवेत असलेली प्रत्येक व्यक्ती, उक्त दिवसापासून त्या विद्यापीठाची कर्मचारी होईल आणि ती या कृषि विद्यापीठाची संबंधित महाविद्यालये किंवा संस्था इत्यादींची कर्मचारी असण्याचे बंद होईल.

(२) नियत दिवसानंतर शक्य तेवढ्या लवकर, राज्य शासनास, संबंधित कृषि विद्यापीठे आणि विद्यापीठ यांच्या कुलगुरुशी विचारविनिमय केल्यानंतर सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे असा निदेश देता येईल की,—

(एक) नियत दिवसाच्या लगतपूर्वी, पहिल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या संस्थांमध्ये सेवेत असतील असे राज्य शासनाचे कर्मचारी; आणि

(दोन) अशा आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील असे कृषि विद्यापीठाचे कर्मचारी, या अशा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापासून विद्यापीठाच्या कामकाजासंबंधात सेवा करण्यासाठी दिलेले कर्मचारी असतील:

परंतु, विद्यापीठाच्या पशुवैद्यकीय विज्ञान व मत्स्यव्यवसाय विज्ञान व पशुसंवर्धन या शाखातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नियत दिवसाच्या लगतपूर्वीच्या दिवसाला ते ज्या पदावर असतील; त्या पदासह सेवेत ठेवून घेण्यास उक्त विद्यापीठ कबूल असेल, तर त्या कर्मचाऱ्यांना उक्त विद्यापीठांकडे राहण्याचा विकल्प वापरता येईल.

भविष्यनिर्वाह निधी आणि इतर तत्सम निधींचे हस्तांतरण.

**६५.** (१) नियत दिवसाच्या लगतपूर्वीच्या दिवसाला, कलम ६४, पोट-कलम (१) मध्ये निर्देश केलेल्या व्यक्तींच्या आणि पोट-कलम (२) अन्वये काढण्यात आलेल्या आदेशामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या तारखांना त्या कलमाच्या पोट-कलम (२) मध्ये निर्देश केलेल्या कर्मचाऱ्यांच्या भविष्यनिर्वाह निधी खात्यावर जमा असलेली रक्कम या विद्यापीठाकडे हस्तांतरित करण्यात येईल आणि उक्त भविष्यनिर्वाह निधी खात्याशी संबंधित दायित्वे हे या विद्यापीठाचे दायित्व ठरेल.

(२) कृषि, विद्यापीठांच्या किंवा यथास्थिति, राज्य शासनाच्या नियत सेवावधी निधीतून व असल्यास, त्यासारख्या इतर निधीमधून, कलम ६४ च्या पोट-कलम (१) व (२) मध्ये निर्देश केलेल्या व्यक्तींच्या वतीने नियत सेवावधी निधीमध्ये किंवा असल्यास, त्यासारख्या इतर निधीमध्ये जमा करण्यात आलेल्या रकमा विद्यापीठाला प्रदान करण्यात येतील. अशा प्रदान केलेल्या रकमा विद्यापीठाद्वारे त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या हितार्थ स्थापन केलेल्या नियत सेवावधी निधीचा किंवा असल्यास, त्यासारख्या इतर कोणत्याही निधीचा भाग होतील.

विद्यापीठाला विवक्षित रकमा प्रदान करणे.

**६६.** (१) कृषी विद्यापीठे नियत दिवशी त्यांच्या निधीमध्ये असलेल्या रकमांपैकी राज्य शासन, उक्त विद्यापीठांशी विचारविनिमय करून, विनिर्दिष्ट करील अशा रकमा, त्या विद्यापीठाला प्रदान करतील.

(२) पोट-कलम (१) अन्वये देय असणारी रक्कम ही, कलम ६५ अन्वये हस्तांतरित केलेल्या रकमांव्यतिरिक्त असेल.

(शा.म.मु.) एच ४१०७—७ (५,५९७—१-२०१४)

प्रकरण अकरा

## संक्रमणकालीन तरतुदी

पहिल्या कुलुगुरुंची नियुक्ती.

**६७.** कलम १६ च्या पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, नियत दिवसापासून सहा महिन्यांच्या आत राज्य शासन, त्याच्याकडून निश्चित करण्यात यावयाच्या वेतनावर, तीन वर्षांपेक्षा जास्त नसेल इतक्या कालावधीकरिता आणि त्यास योग्य वाटेल अशा इतर शर्तीवर पहिल्या कुलगुरुची नियुक्ती करील :

परंतु, पहिला कुलगुरु म्हणून नियुक्त झालेली व्यक्ती, जर तिच्या पदावधीत तिच्या वयाची साठ वर्षे पूर्ण होत असतील तर, त्या दिवसापासून त्या पदावरून निवृत्त होईल.

पहिल्या कुलुगुरुंचे संक्रमणकालीन अधिकार.

**६८.** (१) नियत दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत किंवा राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा एका वर्षापेक्षा जास्त नसेल अशा त्याहून अधिक कालावधीत, कलम २५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांची रचना करण्याची व्यवस्था करणे हे पहिल्या कुलगुरुंचे कर्तव्य असेल.

(२) पहिला कुलगुरु, राज्य शासनाशी विचारविनिमय करून विद्यापीठाचे कार्य चालू राहण्यासाठी आवश्यक असेल असे नियम तयार करील.

(३) पोट-कलम (१) अन्वये रचना करण्यात आलेली प्राधिकरणे, राज्य शासन अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा दिनांकास किंवा दिनांकाना आपले अधिकार वापरण्यास व आपली कर्तव्ये पार पाडण्यास सुरुवात करतील.

पहिल्या कुलुसचिवाची नियुक्ती.

**६९.** कलम १८ च्या पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, नियत दिनांकापासून पहिल्या तीन महिन्यांच्या कालावधीत राज्य शासन, त्याने निश्चित करावयाच्या वेतनावर तीन वर्षांपेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीकरिता आणि त्यास योग्य वाटेल अशा इतर शर्तीवर पहिल्या कुलसचिवांची नियुक्ती करील :

परंतु, पहिला कुलसचिव म्हणून नियुक्ती करण्यात आलेली व्यक्ती, तिच्या पदावधीत वयाची अठ्ठावन्न वर्षे पूर्ण करीत असेल तर, त्या दिवसापासून त्या पदावरून निवृत्त होईल.

पहिल्या कार्यकारी परिषदेची रचना.

**७०.** कलम २६ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, त्या कलमानुसार रचना करावयाच्या विद्यापीठ कार्यकारी परिषदेची पहिली सभा होईपर्यंत, या अधिनियमाच्या, प्रयोजनासाठी, पुढील सदस्यांची मिळून होणारी कार्यकारी परिषद नियत दिनांकापासून स्थापन झाली असल्याचे मानण्यात येईल :-

(अ) कुलगुरु-पदसिद्ध अध्यक्ष ;

(ब) दुग्धव्यवसाय विकास आयुक्त किंवा त्याने नामनिर्दिष्ट केलेली अतिरिक्त आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जाची नसेल अशी व्यक्ती ;

(क) पशुसंवर्धन आयुक्त किंवा त्याने नामनिर्दिष्ट केलेली पशुसंवर्धन सह संचालक यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जाची नसेल अशी व्यक्ती ;

(ड) मत्स्यव्यवसाय आयुक्त ;

(ई) विद्यापीठाचे संचालक ;

(फ) प्रति-कुलपतीने नामनिर्देशित करावयाचा एक अधिष्ठाता ;

(ग) कुलपतीने नामनिर्देशित करावयाचा एक मत्स्यव्यवसाय वैज्ञानिक ;

(ह) प्रति-कुलपतीने नामनिर्देशित करावयाचा एक प्रगतिशील शेतकरी ;

(आय) भारतीय कृषी संशोधन परिषदेचा एक प्रतिनिधी ;

(ज) राज्य शासनाने नामनिर्देशित करावाचे, महाराष्ट्र विधानसभेचे तीन सदस्य ;

(के) राज्य शासनाने नाम-निर्देशित करावयाचे महाराष्ट्र विधानपरिषदेचे दोन सदस्य ;

(ल) प्रति-कुलपतीने नामनिर्देशित करावयाचा प्रत्येक महसुली विभागातून एक अशा सहा जिल्हा परिषदांच्या पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय समितीचा समितीप्रमुख ;

(म) कुलसचिव हा कार्यकारी परिषदेचा पदसिद्ध सचिव असेल.

**७१.** कलम २९ च्या पोट-कलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, त्या पोट-कलमाच्या तरतुदींनुसार रचना करावयाच्या विद्यापरिषदेची पहिली सभा होईपर्यंतच्या काळासाठी या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी पुढील सदस्यांची मिळून होणारी विद्यापरिषद नियत दिनांकापासून स्थापन झाली असल्याचे मानण्यात येईल :— पहिल्या विद्यापरिषदेची रचना.

(क) कुलगुरु-पदसिद्ध अध्यक्ष ;

(ख) विद्यापीठाचा संचालक ;

(ग) विद्याशाखेचा अधिष्ठाता ;

(घ) प्रति-कुलपतीने नामनिर्देशित करावयाचे दोन सहयोगी अधिष्ठाते ; कुलसचिव हा विद्यापरिषदेचा पदसिद्ध सचिव असेल.

**७२.** या अधिनियमात, परिनियमांत किंवा विनियमांत काहीही अंतर्भूत असले तरी, पहिल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या महाविद्यालयातील किंवा संस्थेतील जो विद्यार्थी अशा महाविद्यालयांमध्ये किंवा संस्थांमध्ये नियत दिवसापूर्वी शिकत असेल व कृषी विद्यापीठाकडून घेण्यात येणाऱ्या कोणत्याही परिक्षेला बसण्यास पात्र असेल अशा प्रत्येक विद्यार्थ्याला त्याचा अभ्यासक्रम पूर्ण करण्याची परवानगी देण्यात येईल किंवा विद्यापीठाच्या परीक्षेला प्रवेश देण्यात येईल आणि विद्यापीठ पुढील गोष्टींसाठी व्यवस्था करील :— विद्यार्थ्यांकरिता विशेष तरतुदी.

(अ) पहिला कुलगुरु निर्धारित करील अशा विद्यार्थ्यांसाठी अशा कालावधीकरिता आणि अशा कोणत्याही रीतीने कृषी विद्यापीठांच्या अभ्यासक्रमाशी सुसंगत असे, शिक्षण, अध्यापन, प्रशिक्षण देणे आणि परीक्षा घेणे ; आणि

(ब) अशा परीक्षांच्या निकालानंतर पात्र विद्यार्थ्यांला विद्यापीठाची संबंधित पदवी, पदविका किंवा इतर शैक्षणिक विशेषोपाधी प्रदान करणे.

प्रकरण बारा

## सुधारणा, व्यावृत्ती व अडचणी दूर करणे

१९८३ चा महा. ४१. **७३.** महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ यात नियत दिनांकापासून दुसऱ्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल तेवढ्या मर्यादेपर्यंत आणि त्यारीतीने सुधारणा करण्यात येईल. सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ ची सुधारणा.

व्यावृत्ती. **७४.** (१) कोणत्याही कृषी विद्यापीठांच्या कोणत्याही अधिनियमामध्ये किंवा कोणत्याही अधिनियमाखाली काढलेल्या कोणत्याही संलेखामध्ये, विद्यापीठाच्या पशुवैद्यकीय, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय महाविद्यालयांच्या बाबतीत असलेल्या सर्व निर्देशांचा अर्थ, ते या विद्यापीठाचे निर्देश असल्याप्रमाणे लावण्यात येईल.

(२) कोणत्याही कृषी विद्यापीठाचा पदवीधर म्हणून नोंदणी करण्यात आलेले किंवा नोंदणी करण्यात आल्याचे मानण्यात आलेले, पशू आणि मत्स्यव्यवसाय विज्ञानातील सर्व पदवीधर या विद्यापीठाचे नोंदणीकृत पदवीधर असल्याचे मानण्यात येईल.

(३) कोणत्याही कृषी विद्यापीठाने केलेले पशुवैद्यकीय, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विद्याशाखांशी संबंधित सर्व परिनियम, ते या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील तेथवर आणि या अधिनियमाखाली केलेल्या परिनियमांद्वारे त्यांचे अधिक्रमण करण्यात येईपर्यंत किंवा त्यांत फेरबदल करण्यात येईपर्यंत अंमलात असल्याचे चालू राहील व ते या अधिनियमान्वये केले असल्याचे मानण्यात येईल.

(४) कोणत्याही कृषी विद्यापीठांच्या कार्यकारी परिषदेने, विद्या परिषदेने किंवा पशु वैद्यकीय, दुग्धव्यवसाय व मत्स्यवसाय विद्याशाखांनी किंवा इतर प्राधिकरणाने केलेले सर्व विनियम या अधिनियमाच्या तरतुदींशी ते विसंगत नसतील तेथवर आणि या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या विनियमांद्वारे त्यांचे अधिक्रमण करण्यात येईपर्यंत किंवा त्यात फेरबदल करण्यात येईपर्यंत अंमलात राहतील व यथास्थिति, या विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेने, विद्या परिषदेने, पशुवैद्यकीय, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विद्याशाखेने किंवा इतर प्राधिकरणाने केले असल्याचे समजण्यात येईल.

(५) कोणत्याही कृषी विद्यापीठांच्या कोणत्याही प्राधिकरणाने काढलेल्या किंवा जारी केलेल्या सर्व नोटिसा व आदेश हे, या अधिनियमाच्या तरतुदींशी तेथवर विसंगत नसतील तेथवर व या अधिनियमान्वये त्यांचे अधिक्रमण करण्यात येईपर्यंत किंवा त्यात फेरबदल करण्यात येईतोपर्यंत अंमलात असण्याचे चालू राहील व ते विद्यापीठाच्या संबंधित प्राधिकरणाने केले असल्याचे समजण्यात येईल ;

परंतु, महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ अन्वये करण्यात आलेले किंवा काढण्यात आलेले आणि नियत दिनांकाच्या निकटपूर्वी अंमलात असलेले कोणतेही परिनियम, विनियम, नियम नोटिसा, किंवा आदेश हे, या अधिनियमान्वये असे परिनियम विनियम, नियम, नोटिसा किंवा आदेश काढण्याचा अधिकार हा निराळ्या प्राधिकरणाकडे किंवा संस्थेकडे किंवा अधिकाऱ्याकडे निहित आहे किंवा त्याचा विषय हा दुय्यम विधिविधानाच्या निराळ्या स्वरूपात किंवा या अधिनियमाखाली करावायाच्या संलेखाखालीच केवळ अनुज्ञेय आहे. याच केवळ कारणावरून या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत असल्याचे समजण्यात येणार नाही. १९८३ चा महा. ४१.

अडचणी दूर करणे. **७५.** या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यात कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास परिस्थितीनुरूप, नियत दिनांकापासून दोन वर्षांनंतरचा असणार नाही अशा कालावधीमध्ये अडचणी दूर करण्याच्या प्रयोजनासाठी त्यास आवश्यक व इष्ट वाटेल अशी या अधिनियमाची उद्दिष्टे व प्रयोजने यांच्याशी विसंगत नसणारी, कोणतीही गोष्ट आदेशान्वये करता येईल.

# पहिली अनुसूची

[ कलम ६२ (ब) पहा]

## (अ) महाविद्यालये

(१) मुंबई पशुवैद्यक महाविद्यालय, मुंबई

(२) पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी.

(३) पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर.

(४) क्रांतीसिंह नाना पाटील पशुवैद्यक महाविद्यालय, शिरवळ.

(५) नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय, नागपूर.

(६) मत्स्यव्यवसाय महाविद्यालय, शिरगाव.

(७) स्तानतकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला.

(८) दुग्धव्यवसाय तंत्रशास्त्र महाविद्यालय, वरुड, तालुका पुसद, जिल्हा यवतमाळ.

## (ब) संशोधन केंद्रे/संस्था

(१) तारापोरवाला व सागरी जीवशास्त्रीय संशोधन केंद्र, मुंबई.

(२) सागरी जीवशास्त्रीय केंद्र, रत्नागिरी.

(३) मत्स्यव्यवसाय विषयक संशोधन केंद्र, अकोला.

(४) गोसंशोधन केंद्र, इगतपुरी.

(५) गोसंशोधन केंद्र, राहुरी

(६) चारा संशोधन केंद्र, पालघऱ.

(७) खारजमीन संशोधन केंद्र, पनवेल.

(८) मेंढी व बकरी संशोधन प्रकल्प, राहुरी.

## (क) प्रशिक्षण केंद्रे

(१) दुग्धव्यवसाय व्यवस्थापन व पशुसंवर्धन पाठ्यक्रम संस्था, दापचेरी.

(२) पशुसंवर्धन विभागाचा सेवांतर्गत पदविका पाठ्यक्रम, गोखलेनगर, पुणे.

(३) पशुधन पर्यवेक्षक प्रशिक्षण केंद्र, अकोला.

(४) पशुधन पर्यवेक्षक प्रशिक्षण केंद्र, लांजा.

(५) दुग्धव्यवसायविज्ञान संस्था, मुंबई.

## (ड) शासकीय विभाग-पशुसंवर्धन प्रक्षेत्रे

(१) पशुसंवर्धन प्रक्षेत्र, कुडाळ (जिल्हा सिंधुदुर्ग).

(२) पशुसंवर्धन प्रक्षेत्र, उदगीर (जिल्हा लातूर).

(३) पशुसंवर्धन प्रक्षेत्र, इगतपुरी (जिल्हा नाशिक).

(४) पशुसंवर्धन प्रक्षेत्र, बोरगाव मंजू (जिल्हा अकोला).

(५) पशुसंवर्धन प्रक्षेत्र, नागपूर (जिल्हा नागपूर).

### (ई) इतर मान्यताप्राप्त संस्था

(१) कृषी विकास विश्वस्त व्यवस्था, बारामती, जिल्हा पुणे.

(२) कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, भोर, जिल्हा पुणे.

(३) केंद्रीय दुग्धव्यवसाय व्यापारी संघ, श्रीरामपूर, बाभळेश्वर, जिल्हा अहमदनगर.

(४) श्री. मारुतराव धुळे पाटील शिक्षण संस्था, ज्ञानेश्वर नगर, पो. भेंडे बुद्रुक, जि. अहमदनगर.

(५) गौरीशंकर शिक्षण संस्था, जिल्हा सातारा.

(६) कागल शिक्षण संस्था, कागल, जिल्हा कोल्हापूर.

(७) गणेश शिक्षण प्रसारक मंडळ, सारसाळे, जिल्हा सांगली.

(८) शिवकृपा शिक्षण व संशोधन केंद्र, शिराळा, जिल्हा सांगली.

(९) किसान विद्या प्रसारक मंडळ, बोराडी, तालुका शिरपूर, जिल्हा धुळे.

(१०) पशुधन पर्यवेक्षक प्रशिक्षण केंद्र, मांजरी, जिल्हा पुणे.

(११) पशुधन पर्यवेक्षक प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर.

(१२) कृषी विज्ञान केंद्र (खरवटे), दहिवली.

(१३) म्हसोबा शिक्षण प्रसारक मंडळ, निमगाव, म्हाळुंगी, तालुका शिरूर, जिल्हा पुणे.

(१४) कृषी व दुग्धव्यवसाय विज्ञान संस्था, प्रवरानगर, पोस्ट लोणी, तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर.

(१५) फलटण शिक्षण संस्था, फलटण, जिल्हा सातारा.

(१६) कला व वाणिज्य महाविद्यालय, अष्टा तालुका, वाळवा, जिल्हा सांगली,

(१७) शिक्षण प्रसारक मंडळ, अकलुज, जिल्हा सोलापूर.

(१८) भवभूती शिक्षण संस्था, जिल्हा भंडारा.

(१९) शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती.

(२०) धामणगाव शिक्षण संस्था, धामणगांव रेल्वे, जिल्हा अमरावती.

(२१) रावी बहुउद्देशीय शिक्षण संस्था, नागपूर.

(२२) ताराचंद खडसे मा. शिक्षण संस्था, नागपूर.

(२३) शिक्षण मंडळ (पिप्री), वर्धा.

(२४) बांदा शिक्षण प्रसारक मंडळ, चंद्रपूर (सिव्हील लाईन).

(२५) सातपुडा शिक्षण संस्था, जांधवी, जामोद, जिल्हा बुलढाणा.

## दुसरी अनुसूची

(कलम ७३ पहा.)

महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मध्ये,—

(अ) कलम २, खंड (ब) मध्ये, " पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, पशुवैद्यकशास्त्र, मत्स्यव्यवसाय सागरी जीवशास्त्र " हा मजकूर वगळण्यात येईल ;

(ब) कलम ९ मध्ये, " पशुवैद्यकशास्त्र आणि मत्स्यव्यवसायशास्त्र " हा मजकूर वगळण्यात येईल ;

(क) कलम १२, पोट-कलम (३), खंड (ग) मध्ये, " पशुसंवर्धन, फलोत्पादन, वनशास्त्र, दुग्धशाळा विज्ञान व अन्नतंत्रशास्त्र आणि मत्स्यव्यवसाय " या मजकुराऐवजी " फलोत्पादन व अन्न तंत्र शास्त्र आणि वनशास्त्र " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(उ) कलम ३०, पोट-कलम (१) मधील, नोंद (तीन) वगळण्यात येईल;

(ई) कलम ३५, पोट-कलम (१) मध्ये,—

(एक) नोंद (एक) मध्ये, " व पशुसंवर्धन " हा मजकूर वगळण्यात येईल ;

(दोन) नोंद (दोन) व नोंद (नऊ) वगळण्यात येईल ;

(फ) कलम ४५, पोट-कलम (१) मध्ये,—

(एक) नोंद (एक) मध्ये, व " व पशुसंवर्धन " हा मजकुर वगळण्यात येईल ;

(दोन) नोंद (दोन) वगळण्यात येईल ;

(प) कलम ७०, पोट-कलम (२), खंड (दोन) मध्ये, " नोंद (क) " वगळण्यात येईल.

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई